www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक युवक आधार मराठी

मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले  उपसंपादक - श्री.विलास मनोहर गायकवाड  कार्यकारी संपादक - श्री.सुरेश आत्माराम भोईर  निवासी संपादक - श्री. राकेश जनार्दन पाटील  सह संपादक : मुकुंद कांबळे

वर्ष : २  अंक : 186 वा  शनिवार दि. 22 मार्च २०२५  किंमत : ४ रु  पृष्ठ : ४  RNI MAHMAR/2023/89514

दैं. युवक आधार करीता प्रतिनिधी नेमने आहे.
मुंबई, ठाणे नाशिक, रायगड , आलिबाग खोपोली ,पुणे , सांगली , सातारा ,कोल्हापुर, अहमदनगर, औरंगाबाद, बीड, नांदेड, शहर प्रतिनिधी नेमने आहे.
9220403509 संपर्क 9594509661
श्री.संतोष शिवदास आमले | श्री. सुरेश आत्माराम भोईर

# महाराष्ट्रातील शाळांमध्ये CBSE पॅटर्न;
## अभ्यासक्रमाच्या फॉर्म्युलामुळे शिक्षक, पालकांमध्ये संभ्रम !

राज्यातील सीबीएसईचा पॅटर्न वादात सापडला आहे. नव्या पॅटर्ननुसार राज्य शिक्षण मंडळाचा अभ्यासक्रम 30 टक्के तर सीबीएसईचा अभ्यासक्रम 70 टक्के असणार आहे. दरम्यान यानंतर विरोधकांनी काही सवाल केले आहेत.

तसंच शिक्षक आणि पालकांमध्ये देखील संभ्रम निर्माण झाला आहे. आगामी शैक्षणिक वर्षापासून राज्यातील शाळांमध्ये सीबीएसई पॅटर्न लागू करण्यात येणार आहे. शालेय शिक्षणमंत्री दादा भूसे यांनी ही घोषणा केलीय. दरम्यान यासाठी शिक्षकांना योग्य ते प्रशिक्षण देण्यात येणार असल्याचं देखील दादा भुसे यांनी सांगितलं.. मात्र, सीबीएसईची घोषणा करताना अगोदर सर्व व्यवस्था करणं गरजेचं असल्याचं विजय वडेट्टीवारांनी म्हटलंय. दादा भूसे यांनी केलेल्या




घोषणेनंतर जितेंद्र आव्हाडांनी काही प्रश्न उपस्थित केले आहेत. सीबीएसई पॅटर्नमुळे मराठी मातीचा इतिहास पुसला जात असेल तर या पॅटर्नची गरज काय असा सवाल त्यांनी केला. दरम्यान या सीबीएसई पॅटर्नमुळे मराठी आणि इतिहासासोबत कोणतीही तडजोड केली नसल्याचं आमदार ज्ञानेश्वर म्हात्रेंनी म्हटलंय. सीबीएसई पॅटर्नची घोषणा केल्यानंतर शिक्षक आणि पालक देखील संभ्रमात पडले आहेत. अचानक करण्यात आलेला बदल विद्यार्थ्यांना झेपणार का? तसंच शिक्षकांच्या प्रशिक्षणाचं काय? असे अनेक प्रश्न पालकांकडून उपस्थित करण्यात येताय. शालेय शिक्षणमंत्र्यांनी केलेल्या सीबीएसई पॅटर्नच्या घोषणेनंतर विरोधकांनी सवाल उपस्थित केले आहेत. एवढंच नव्हे तर शिक्षक आणि पालकांमध्ये देखील संभ्रम निर्माण झालाय. तसंच 30 टक्के राज्य शिक्षण मंडळाच्या अभ्यासक्रमात इतिहासाला कितपत न्याय मिळणार? असा देखील प्रश्न उपस्थित होतांना दिसतोय.

**दरवर्षी एकेक इयत्तेचा अभ्यासक्रम बदलला जाणार**

राज्यातील शालेय विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमात 70 टक्के - 30% फॉर्म्युला राबवला जाणार आहे. यामध्ये 70 टक्के सीबीएससी तर 30 टक्के राज्य शिक्षण मंडळाचा अभ्यासक्रम असणार आहे. भाषा आणि इतिहास विषयाबाबत कोणतीही तडजोड केली जाणार नाही, अशी माहिती शिक्षक आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे यांनी दिली.सीबीएससी अभ्याक्रमातील इतिहास विषयात राज्य शिक्षण मंडळाच्या **पान २ वर**

# अजित दादाच्या उपस्थित भास्कर "दादा"हाती बांधणार 'घड्याळ"
### नरसी येथे पक्षप्रवेश सोहळ्यास उपस्थित राहण्याचे आवाहन

**दैनिक युवक आधार**
**धर्माबाद (वार्ताहर):**
**गिरमाजी सुर्यकार**

माजी खासदार भास्करराव पाटील खतगावकर यांचा राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीत (अजित पवार गट) प्रवेशाची तारीख निश्चित झाली असून महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादीचे संस्थापक अध्यक्ष अजित दादा पवार, मंत्री सुनील तटकरे, आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्यासह अनेक राष्ट्रवादीच्या वरिष्ठ नेत्यांच्या उपस्थितीत दिनांक 23 मार्च 2025 रोजी नरसी ता. नायगाव येथे पक्षप्रवेश सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असून शेकडो कार्यकर्त्यांसह भास्करराव पाटील खतगावकर, डॉ. मीनलताई खतगावकर, माजी आ. ओमप्रकाश पोकर्णा यांचा राष्ट्रवादी कॉंग्रेस



(अजित पवार गट) या पक्षात प्रवेश होणार आहे. या सोहळ्यास धर्माबाद, देगलूर, बिलोली, नायगाव तालुक्यातील जास्तीत जास्त कार्यकर्त्यांनी उपस्थित रहावे असे आवाहन माजी खासदार भास्करराव पाटील खतगावकर यांनी धर्माबाद येथील शासकीय विश्रामगृहात आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत केले आहे. यावेळी माजी जि. प. सदस्य वसंत सुगावे, **पान २ वर**

# भेंडखळ गावात रंगला हळदी कुंक आणि खेळ पैठणीचा सोहळा.

**दैनिक युवक आधार**
**जिल्हा प्रतिनिधी प्रमुख/ एम.डी.भोईर**

उरण तालुक्यातील भेंडखळ गाव म्हणजे सांस्कृतिक परंपरेने नटलेलं गाव. या गावात दरवर्षी ग्रामपंचायतीच्या माध्यमातून विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. त्यातीलच महिला भगिनींसाठी आनंदाचा सोहळा म्हणजे हळदी कुंकू समारंभ होय. चालू वर्षी बुधवार दिनांक १९ मार्च २०२५ रोजी भेंडखळ गावातील समस्त महिला भगिनींसाठी हळदीकुंकू सोहळ्या बरोबरच मनोरंजनात्मक खेळ आणि खेळ पैठणीचा अशा सुंदर कार्यक्रमाचा आयोजन करण्यात आलं होतं.ग्रामपंचायतीच्या विद्यमान सरपंच सौ मंजिता पाटील,उपसरपंच सौ स्वाती पाटील, विद्यमान सदस्य सौ सोनाली ठाकूर, सौ.संगीता भगत, सौ.शीतल ठाकूर, सौ स्वाती घरत, सौ अक्षता ठाकूर, सौ प्राची पाटील, तसेच ग्रामपंचायत सदस्य श्री अजित ठाकूर, श्री.अभिजीत ठाकूर, श्री.दीपक ठाकूर, श्री लिलेश्वर भगत तसेच ग्रामपंचायत अधिकारी सौ समिक्षा ठाकूर, क्लार्क कुमारी दीपा या सर्वांनी मिळून हळदी कुंकू समारंभ, मनोरंजनात्मक खेळ आणि खेळ पैठणीचा अशा तिहेरी कार्यक्रमाचं यशस्वी आयोजन केले होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला गणपती बाप्पा, सरस्वती माता आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून तसेच दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. अगदी सुरुवातीलाच ज्येष्ठ महिला वर्गासाठी कापसाच्या वाती बनविणे हा खेळ घेण्यात आला



त्याचप्रमाणे केसांमध्ये स्टॉ लावणे,फुगे फुगविणे, संगीत खुर्ची अशा पद्धतीचे मनोरंजनात्मक खेळ घेऊन गावातील समस्त महिला भगिनींचं मनोरंजन करण्यात आलं. गावातील सर्व महिलांनी उत्स्फूर्तपणे या सर्व खेळांमध्ये सहभागी होत कार्यक्रमाचा आनंद लुटला.या सर्व खेळांमध्ये विजयी महिलांना ग्रामपंचायतीच्या माध्यमातून आकर्षक बक्षीस देऊन त्यांचे कौतुक करण्यात आलं.तसेच या विजयी महिलांमध्येच पैठणी जिंकण्यासाठी खेळ रंगला.यात प्रथम आणि द्वितीय क्रमांकाच्या विजेत्या महिलांना पैठणी देऊन सन्मानित करण्यात आले. तदनंतर गावातील समस्त सुहासिनी महिला भगिनींना हळदी कुंकवाचे वाण देऊन भेटवस्तू देण्यातआल्या. दुपारी बारा वाजल्यापासून सुरु झालेल्या या सोहळ्याची सांगता सायंकाळी सहा वाजता झाली. संपूर्ण कार्यक्रम अगदी खेळीमेळीच्या वातावरणात आणि उत्साहात पार पडला. हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी ग्रामपंचायत भेंडखल,सरपंच,उपसरपंच, सर्व सदस्य, ग्रामपंचायत अधिकारी, तसेच कर्मचारी वर्ग गावातील सीआरपी यामध्ये मिलन म्हात्रे, प्रीती भोईर, ज्योती ठाकूर, कल्याणी ठाकूर, प्रमिला ठाकूर तसेच महिला बचत गट वर्ग यांचे विशेष सहकार्य लाभले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ दर्शना माळी व उमंग भोईर या दोघांनी अत्यंत सुरेखरित्या केलं.

## पनवेलमधील मतदारयाद्यांचे पुनरीक्षण करा : शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे)
### पक्षाच्या महानगरसंघटीका लिना गरड

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, (वार्ताहर)**



पनवेल विधानसभा मतदारयादीमध्ये मोठ्या प्रमाणात घोळ असून, मोठ्या प्रमाणात बोगस मतदार आहेत. मतदारयादीत दुहेरी, तिहेरी नावे असून, एकाच कुटुंबातील मतदारांची नावे विविध मतदान केंद्रांवर विभागली गेली आहेत. ही समस्या दूर करावी, अशी मागणी माजी नगरसेविका आणि शिवसेना ठाकरे गटाच्या पनवेल महानगर संघटिका लीना गरड यांनी प्रांत अधिकारी यांनी आयोजित केलेल्या बैठकीत केली. तसेच लेखी निवेदन प्रांत अधिकारी यांना लेखी निवेदन दिले या वेळी अ‍ॅड. बालेश भोजने उपस्थित होते. राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी यांच्या पत्रानुसार मतदारयाद्या तयार करणे व त्यांचे पुनरीक्षण व अद्ययावतीकरण करणे आदी विषयांवर पनवेल तहसील कार्यालयात पनवेल मतदारसंघातील सर्वपक्षीय बैठकीचे आयोजन उपविभागीय अधिकारी पवन चांडक यांच्या उपस्थितीत बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी लीना गरड यांनी निवेदन दिले. पनवेल हा सर्वांत मोठा मतदारसंघ म्हणून ओळखला जातो; परंतु येथील मतदारयादीमध्ये मोठ्या प्रमाणात घोळ असून, अनेक बोगस मतदार आहेत. मतदारयादीत दुहेरी, तिहेरी नावे असून, एकाच कुटुंबातील आई, वडील, मुला, मुलींची नावे विविध मतदान केंद्रावर विभागली गेली आहेत, याशिवाय नियमाप्रमाणे जो यादी भाग आहे, त्याचा नकाशा निवडणूक विभागाकडून चुकीचा तयार करण्यात आला आहे. त्यामुळे पनवेल विधानसभा मतदारसंघातील मतदारयाद्यांचे संपूर्ण पुनरीक्षण व्हावे, अशी मागणी लीना गरड यांनी बैठकीत केली.

## द • ख • ल

### जगलो तर गावाचा, मेलो तर कुटुंबाचा, आमरण उपोषणाचा पाचवा दिवस

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

पनवेल पंचायत समितीच्या आवारात गेल्या पाच दिवसापासून चिखले ग्रामस्थांचे आमरण उपोषण सुरू आहे. यावेळी जगलो तर गावाचा, मेलो तर कुटुंबाचा अशी पाटी उपोषणकर्त्यांनी लावलेली आहे. 17 मार्चपासून पंचायत समिती, पनवेल येथे दत्तात्रय तांडेल यांच्यासहित ग्रामस्थांचे आमरण उपोषण सुरू आहे. चिखले येथे माती उत्खनन केल्याप्रकरणी आणि जमीन खरेदी करणाऱ्यावर फौजदारी आणि अपहाराचा गुन्हा दाखल करण्याची मागणी दत्तात्रय तांडेल आणि ग्रामस्थांनी केली आहे. दरम्यान उपोषणाचा पाचवा दिवस असल्याने उपोषणकर्त्यांची तब्येत खालावली आहे. मात्र तरी देखील प्रशासन




दुर्लक्ष करत असल्याने संताप व्यक्त करण्यात येत आहे. पाचवा दिवस उपोषण सुरू असून प्रशासनाने केवळ एकदाच विचारपूस केली, मात्र त्यांना या ग्रामस्थांच्या जीवनाविषयी काहीही देणेघेणे नसल्याचा आरोप करण्यात येत आहे. लवकरात लवकर माती चोरी करणाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्याची मागणी यावेळी करण्यात आली. माती चोरांना अटक करण्याच्या घोषणा यावेळी देण्यात आल्या.

### आष्टी तालुक्यात पहिली महिला पत्रकार प्रिया पवळ हिची निवड

**दैनिक युवक आधार**
**आष्टी वार्ताहर**



आज पर्यंत पुरुष पत्रकार म्हणून आष्टी तालुक्यात भरपूर पत्रकार कार्यरत आहेत व पत्रकार काम करतात परंतु आष्टी तालुक्यात प्रिया सोन्याबापु पवळ ही पहिली पत्रकार होण्याचा मान तिने मिळवला आष्टी तालुक्यातील सुलेमान देवळा येथीलही प्रिया पवळ प्रिया पवळ दैनिक पुढारीचे पत्रकार कवी प्रेम पवळ यांची ती बहीण तसं पाहिलं तर पवळ या घराण्याला पत्रकारितेचा वारसा आहे. प्रिया पवळ तिचे शिक्षण बीसीए सेकंड ईयर झाले असून तिला शैक्षणिक काळातच सामाजिक राजकीय लिखाणाचा छंद तिने जोपासला आणि आपणही पत्रकार आहोत अशी इच्छा तिच्या मनात सारखीच होती अखेर तिने तिची इच्छा पूर्ण केली दैनिक टाइम्स (माजलगाव ) या अग्रगण्य दैनिकांनी तिला आष्टी तालुका प्रतिनिधी म्हणून घोषित केले. पहिलीच महिला पत्रकार झाल्याने तिच्यावर अभिनंदनाचा वर्षांव होऊ लागला आहे. ग्रामीण भागातील एक तरूणी पत्रकारिता क्षेत्रात पदार्पण करत असल्याने भविष्यात नक्कीच गावासह जिल्हयाचे नावलौकिक करील यात तीळमात्र शंका नसल्याचे दिसुन येत आहे.

### पाईट पापळवाडी फाटा येथे घोडी वाघाच्या हल्ल्यात ठार

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी डॉ. देवेंद्र ओव्हाळ**
**खेड पुणे**



श्री संतोष मोहन ढोरे यांच्या कांद्याच्या वावरामध्ये पात चारण्यासाठी तात्या धनगर यांनी आपला वाडा बसविला होता रात्री साडे सातच्या दरम्यान प्रथमता बिबट्याने मेंढरं वरती हल्ला केला त्यानंतर धनगर बाबा ने बिबट्यावर प्रति हल्ला करत हुसकवण्याचा प्रयत्न केला बिबट्या थोडा लांब जाऊन पुन्हा त्याने घोडी वरती झेप टाकून हल्ला केला व शेतकऱ्याने लावलेले नेपर गवत त्यामध्ये घोड्याला घेऊन खाऊन टाकले. धनगर बाबा चे घोडे नेल्याने त्यांचे मोठे नुकसान झाले आहे त्यांना वन विभागाकडून आर्थिक गरज मिळणे आवश्यक आहे. यापूर्वी सुद्धा पापळवाडी येथे एका तरुणावरती बिबट्याने हल्ला केला होता त्यामध्ये तो जखमी झाला होता. परिसरामध्ये बिबट्याचा वावर मोठ्या प्रमाणात वाढला आहे तसेच संध्याकाळच्या वेळेला बिबट्या भर रस्त्यात मोकाटपणे फिरताना दिसत आहे सदर ठिकाणी तात्काळ पिंजरे बसवण्याची मागणी वनविभागाकडे जयसिंग दरेकर यांनी केलेली आहे.

# अग्निशमन दलाच्या ताफ्यात छोट्या गाड्यांचा समावेश करावा – एमआयएमची मागणी

**दैनिक युवक आधार**
**छत्रपती संभाजीनगर**

शहरातील अरुंद रस्त्यांवरून मोठ्या अग्निशमन गाड्या जाऊ शकत नसल्याने अनेक ठिकाणी आग लागल्यास मोठे नुकसान होत आहे. या पार्श्वभूमीवर, मजलिस-ए-इत्तेहादुल मुस्लिमीन (एमआयएम) च्या युवक आणि महिला विभागातर्फे महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक जी. श्रीकांत यांना निवेदन सादर करण्यात आले. यात शहरातील अग्निशमन दलाच्या ताफ्यात लहान अग्निशमन वाहने (Mini Fire Tenders) समाविष्ट करण्याची मागणी करण्यात आली आहे.

**अरुंद रस्त्यांमुळे मदत पोहोचण्यात अडथळा**

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) शहर ऐतिहासिक वारसा लाभलेले असून, येथील ७० टक्क्यांहून अधिक भागात १५ ते २० फुटांचे अरुंद रस्ते आहेत. यामुळे महानगरपालिकेच्या अग्निशमन दलाच्या मोठ्या गाड्या या भागांत सहज प्रवेश करू शकत नाहीत. परिणामी, दुर्घटनांमध्ये वित्त आणि जीवित हानी मोठ्या प्रमाणावर




होत आहे. मागील काही वर्षांत शहरातील अनेक वसाहतींमध्ये मोठ्या प्रमाणावर आग लागण्याच्या घटना घडल्या असून, वेळेत अग्निशमन दल पोहोचू शकले नाही, याचा फटका स्थानिक नागरिकांना बसला आहे.

**लहान अग्निशमन वाहने आवश्यक**

यासंदर्भात एमआयएमच्या पदाधिकाऱ्यांनी महानगरपालिकेकडे लहान अग्निशमन वाहने उपलब्ध करून देण्याची मागणी केली आहे. अशा प्रकारच्या वाहनांमुळे अग्निशमन यंत्रणा अधिक वेगाने आणि प्रभावीपणे कार्य करू शकेल. अरुंद गल्ल्या, रहदारीचे रस्ते आणि अडचणीच्या ठिकाणी ही वाहने सहज पोहोचू शकतील.

**नागरिकांच्या सुरक्षेसाठी तातडीची कारवाई आवश्यक**

शहरातील वाढत्या आग लागण्याच्या घटनांमुळे अग्निशमन दलाच्या साधनसुविधांमध्ये त्वरित सुधारणा करणे गरजेचे आहे. खास करून जुनी वसाहत, दाटीवाटीची बाजारपेठ आणि झोपडपट्टी भागांमध्ये आगीचा मोठा धोका असून, लहान अग्निशमन गाड्या उपलब्ध झाल्यास नागरिकांना मदत मिळवणे सोपे होईल.

**निवेदनावर एमआयएमच्या पदाधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या**

या निवेदनावर एमआयएमचे जिल्हाध्यक्ष समीर साजिद बिल्डर, युवा जिल्हा कार्याध्यक्ष जावेद खान, युवा जिल्हा महासचिव शेख कलीम, महिला शहर कार्याध्यक्ष अंकिता गजहास, सोशल मीडिया जिल्हाध्यक्ष अनिस पटेल, सोशल मीडिया समन्वयक सय्यद युसुफ, युवा जिल्हा सहसचिव रफिक पटेल, अखिल पठाण, तसेच कलीम खान, मेहराज खान, रिजवान पठाण, सोहेल सय्यद, निर्मला दोडे, वसीम सिद्दीकी, मंदा नवगीरे आणि इतर पदाधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत. महानगरपालिकेकडून या मागणीवर कोणता निर्णय घेतला जातो, याकडे शहरातील नागरिकांचे लक्ष लागून आहे. नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टिकोनातून प्रशासनाने तातडीने कारवाई करावी, अशी मागणी होत आहे.

## हिरकणी महिला मंच आयोजित वाह होम मिनिस्टर फेम नितीन दीक्षित यांचा खेळ पैठणीचा कार्यक्रम संपन्न

**अमरावती विभागीय**
**संपादक संदीप मापारी (लोणार).**



तालुक्यातील महिलांच्या कलागुणांना व्यासपीठ मिळावी म्हणून महिला दिनाचे औचित्य साधून हिरकणी महिला मंचच्या वतीने संभाजीनगर येथील वाह होम मिनिस्टर फेम नितीन दीक्षित यांचा खेळ पैठणीचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात 18 मार्च रोजी श्री मंगल कार्यालय या ठिकाणी पार पडला. या कार्यक्रमाचे उद्घाटन सौ. इंदुताई प्रकाशराव मापारी यांच्या हस्ते पार पडला. शहरासह तालुक्यातील महिलांना चूल मूल व घर प्रपंच संभाळत असताना त्यांच्यामध्ये असलेल्या विविध कलागुणांना वाव मिळावा तालुक्यातील महिलांचा एकमेकांशी परिचय व्हावा या कार्यक्रमांमधून त्यांना मनोरंजनासह आनंद मिळावा हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून हिरकणी महिला मंचच्यावतीने संपूर्ण महाराष्ट्रात परिचित असलेले व महिला वर्गात लोकप्रिय असलेले छत्रपती संभाजीनगर येथील नितीन दीक्षित यांचा खेळ पैठणीचा कार्यक्रम संपन्न झाला या कार्यक्रमांमध्ये तालुक्यातील मोठ्या संख्येने महिलांनी भाग घेतला लांब उखाणे घेणे, संगीत खुर्ची, तळ्यात मळ्यात, फॅशन शो, प्रश्नमंजुषा, गरबा यासारखे महिलांना लोकप्रिय असलेले कार्यक्रम यावेळी संपन्न झाले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी हिरकणी महिला मंचच्या सौ. सुनिता बळीराम मापारी, अर्चना सूर्यकांत मापारी, अंजली सचिन इंगळे, कविता भास्कर मापारी, स्वाती अरुण मापारी, समृद्धी अजिंक्य मापारी, शितल विलास जाधव, रेणुका सखाराम खोत, सुप्रिया गजानन मापारी, राखी आशिष अग्रोया, साधना विजय पोफळे, वर्षा अश्विन मापारी, सपना विजय मापारी, प्रियंका प्रशांत बनमेरू, प्रीती श्रीपाल संचेती, स्वाती दत्तात्रय मापारी, लता विजय ठाकूर, चांगुणा विजय चव्हाण, स्वाती प्रमोद मापारी, जयश्री राजेश गायकवाड, सुरेखा सुरेश बेदमुथा या महिलांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मेहनत घेतली. प्रथम बक्षीस पैठणीची माळ विजेता कल्याणी निरज जाधव यांच्या गळ्यात पडली, तर द्वितीय पैठणी विजेत्या नमिता अभय खिवसरा यांना तर तृतीय बक्षीस रूपाली अभिजीत मापारी यांना मिळाले इतर विजेता महिलांना नेकलेस सेट डिनर सेट चांदीचे नाणे व इतर घरगुती वापराच्या वस्तू मिळाल्या यावर्षीप्रमाणे दरवर्षी असाच कार्यक्रम घेण्यात यावा असा सूर तालुक्यातील महिलांनी हिरकणी महिला मंच कडे व्यक्त केला.

## संपादकीय

**वेलकम होम, सुनीता!**

नियोजित वेळेपेक्षा नऊ महिने अधिक काळ आंतरराष्ट्रीय अवकाश स्थानकात (आयएसएस) व्यतीत केल्यानंतर, भारतीय वंशाच्या ज्येष्ठ अमेरिकन अंतराळवीर सुनीता विल्यम्स बुधवारी त्यांचे सहकारी बुच विल्मोर, निक हेग आणि रशियन अंतराळवीर अलेक्झांडर गोरबुनोव्ह यांच्यासह, भारतीय प्रमाणवेळेनुसार पहाटे ३:२७ वाजता सुरक्षितपणे पृथ्वीवर परतल्या. त्यांच्या स्पेसएक्स क्रू ड्रॅगन कॅप्सूलने फ्लोरिडाच्या किनारपट्टीजवळ, मेक्सिकोच्या आखातात अचूक ‘स्प्लॅशडाऊन’ केले आणि एका असाधारणरीत्या वाढलेल्या मोहिमेचा सुखद शेवट झाला. जून २०२४ मध्ये चाचणी उड्डाण म्हणून नियोजित केलेली अवघ्या आठ दिवसांची मोहीम, अंतराळयानात उद्‌भवलेल्या अनपेक्षित तांत्रिक अडचणींमुळे तब्बल २८६ दिवसांपर्यंत वाढली. सुनीता विल्यम्स आणि बुच विल्मोर यांनी बोईंग कंपनीद्वारा विकसित स्टारलाइनर यानातून ‘आयएसएस’कडे प्रस्थान केले होते. स्टारलाइनरची ही पहिलीच मानवी मोहीम होती. ‘नासा’च्या व्यावसायिक क्रू कार्यक्रमात स्पेसएक्ससोबतच बोईंगला एक विश्वासार्ह भागीदार म्हणून स्थापित करणे आणि अंतराळवीरांच्या वाहतुकीसाठीच्या पर्यायांत विविधता आणणे हा या चाचणी उड्डाणाचा उद्देश होता. पृथ्वीवरून आयएसएसपर्यंत आणि परत अंतराळवीरांची ने-आण करण्याची क्षमता स्टारलाइनरने सिद्ध करणे अपेक्षित होते; मात्र स्थानकात पोहोचल्यानंतर लवकरच यानातील इंधन गळती, थ्रस्टर यंत्रणेतील दोष आणि इतर तांत्रिक अडचणींमुळे ते परतीच्या प्रवासासाठी अपयशी ठरू शकते, अशी भीती व्यक्त करण्यात आली. परिणामी `नासा’ने विल्यम्स आणि विल्मोर यांना स्थानकातच ठेवण्याचा आणि स्टारलाइनरला चालकविरहित अवस्थेत पृथ्वीवर परत आणण्याचा निर्णय घेतला. या अनपेक्षित संकटाने अंतराळवीरांच्या शारीरिक व मानसिक कणखरतेची परीक्षा घेतली आणि मानवी अंतराळ उड्डाणातील अंतर्निहित आव्हाने व गुंतागुंत अधोरेखित केली. मोहीम अनपेक्षितरीत्या लांबूनही, सुनीता विल्यम्स आणि बुच विल्मोर यांनी मात्र त्यांच्या नवीन दिनचर्येशी सहजपणे जुळवून घेतले होते. निष्क्रिय दर्शक होण्याऐवजी, त्यांनी दीडशेहून अधिक प्रयोगांमध्ये योगदान दिले. त्यामध्ये अंतराळ शेती, मानवी आरोग्यावरील सूक्ष्म गुरुत्वाकर्षणाचे परिणाम आणि अंतराळात द्रवांचे वर्तन, इत्यादी वैज्ञानिक विषयांचा समावेश होता. वैज्ञानिक योगदानांव्यतिरिक्त, विल्यम्स आणि विल्मोर यांनी आयएसएसच्या देखभालीमध्येही महत्त्वपूर्ण भूमिका बजावली, आवश्यक दुरुस्ती केली आणि `स्पेस वॉक’देखील केले. या विस्तारित कालावधीत, सुनीता विल्यम्स यांनी कारकिर्दीत दुसऱ्यांदा आयएसएसच्या नेतृत्वाची धुराही सांभाळली. त्यांनी माजी नासा अंतराळवीर पेगी व्हिटसन यांचा, महिला अंतराळवीराद्वारे सर्वाधिक एकत्रित ‘स्पेस वॉक’चा विक्रमही मोडला. त्यांनी त्यांच्या कारकिर्दीत आयएसएसबाहेर एकूण ६२ तास आणि ६ मिनिटे घालवली आहेत. सुनीता विल्यम्स भारतीय वंशाच्या असल्याने संपूर्ण भारत त्यांच्या सुरक्षिततेसंदर्भात चिंताक्रांत होता. बुधवारची रात्र अनेक भारतीयांनी वृत्तवाहिन्यांकडे डोळे लावून जागून काढली आणि सुनीता विल्यम्स यांच्या सुरक्षित आगमनासाठी प्रार्थना केली. अंतराळयान सुरक्षितपणे समुद्रात उतरल्याचे स्पष्ट होताच, अमेरिकेप्रमाणेच भारतातही जल्लोष झाला. सुनीता विल्यम्स यांचे मूळ गाव असलेल्या गुजरातमधील झुलासनमध्ये तर विशेष जल्लोष झाला. सुनीता विल्यम्स यांचे यश संपूर्ण भारतासाठी अभिमानाचा विषय ठरले आहे. अशाच एका अंतराळ मोहिमेदरम्यान पृथ्वीवर परतताना अंतराळयानात स्फोट झाल्याने निधन झालेल्या भारतीय वंशाच्या महिला अंतराळवीर कल्पना चावला आणि सुनीता विल्यम्स या दोघींनी अनेक भारतीय तरुण-तरुणींना विज्ञान आणि अंतराळ क्षेत्रात ‘करिअर’ करण्याची प्रेरणा दिली आहे. सुनीता विल्यम्स आणि बुच विल्मोर यांचा वाढीव अंतराळ मुक्काम, अंतराळ प्रवासातील अनिश्चितता आणि आव्हानांकडे लक्ष वेधतो. भविष्यातील मोहिमांसाठी दीर्घकालीन अंतराळ प्रवासाची तयारी, विश्वासार्ह अंतराळयानांची उपलब्धता आणि नव्याने विकसित यंत्रणांची काटेकोर चाचणी घेण्याचे महत्त्वच त्यातून अधोरेखित झाले आहे. लवकरच ‘गगनयान’ मोहीम हाती घेणार असलेल्या भारतासाठीही हा मोठा धडा आहे. परतीला अनिश्चित विलंब होऊनही सुनीता विल्यम्स आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी अतिशय संयम आणि धैर्याने परिस्थिती हाताळली. त्यांच्या यशस्वी परतीने अंतराळ संशोधनातील एक नवा अध्याय लिहिला गेला आहे !

# प्रकल्पग्रस्तांचे जाहीर निषेध आंदोलनास तुर्तास स्थगिती.

**दैनिक युवक आधार**
**तृप्ती भोईर उरण/ प्रतिनिधी**

शुक्रवार दिनांक २१ मार्च २०२५ रोजी सकाळी १० वाजता पालक संघर्ष समिती जवाहरलाल पोर्ट विद्यालय शेवा आणि प्रकल्पग्रस्त सर्व गावातील ग्रामस्थांचे जे. एन. पी. ए प्रशासन व आर.के.एफ. प्रशासनाच्या मनमानी कारभाराविरोधात जाहीर निषेध करण्यासाठी २१ मार्च २०२५ रोजी माध्यमिक शाळेच्या गेट समोर पुकारण्यात आलेले निषेध आंदोलन जे.एन पी. ए प्रशासनाचे मान. चेअरमन श्री उन्मेष वाघ साहेब व जे एन पी ए विश्वस्त मा. दिनेश पाटील साहेब, मा. रविंद्र पाटील साहेब,व कॉम्. भुषण पाटील साहेब यांच्या सोबत दिनांक २० मार्च रोजी झालेल्या मिटींगमध्ये प्रकल्पग्रस्त पालक व कंत्राटी शिक्षकांना आपल्या मागण्यांबाबत सकारात्मक आश्वासन देण्यात आल्या मुळे सदर निषेध आंदोलन पालक संघर्ष समीतीने आंदोलन तुर्तास स्थगीत केले आहे. या आंदोलनाच्या प्रमुख मागण्या प्रकल्पग्रस्त पाल्यांची फि सवलत पुर्ववत चालू ठेवण्याचा, कंत्राटी व कायमस्वरूपी असणाऱ्या शिक्षकांचे प्रश्न येत्या ३० एप्रिल पुर्वी सोडविण्याचे आश्वासन मा. चेअरमन उन्मेश वाघ साहेबांनी दिले आहे, त्यामुळे तुर्तास निषेध आंदोलन स्थगित करण्यात आले आहे. परंतू जे. एन पी. ए. चे मा. चेअरमन उन्मेश वाघ साहेब जेएनपीए विश्वस्त व पालक संघर्ष समितीच्या कार्यकारिणी सोबत२० मार्चला झालेल्या मिटिंग मध्ये कोणते निर्णय घेण्यात आले कोणत्या विषयावर चर्चा करण्यात आली हे



सर्व पालक, प्रकल्पग्रस्त, ग्रामस्थ, शिक्षक,

शिक्षकेतर कर्मचारी यांना माहिती व्हावी याकरिता जे एन पी ए विश्वस्त मा. दिनेश पाटील सर, रविंद्र पाटील सर व भुषण पाटील सर यांच्या उपस्थितीत माध्यमिक शाळेच्या गेट समोर मिटिंग घेऊन निषेध आंदोलनास स्थगिती देण्यात आली. या निषेध मिटिंग मध्ये कामगार विश्वस्त मा. भुषण पाटील, रविंद्र पाटील, व दिनेश पाटील या तीनही ट्रस्टींनी पालक, विद्यार्थी, शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी,यांच्या सोबत आम्ही आहोत हे ठामपणे सांगितले तसेच ज्या मागण्या मान्य करण्यात आल्या आहेत त्याची पूर्णपणे अंमलबजावणी झाल्याशिवाय हा लढा संपला नाही, आर.के.एफ.शाळा प्रशासनाच्या मनमानी कारभाराविरोधातही आम्ही संघर्ष करू, वेळोवेळी प्रकल्पग्रस्तांच्या समस्या सोडविण्यासाठी आम्ही कटिबद्ध राहणार ,असे आश्वासीत केले. मिठागरे, स्थानिक मच्छीमारांची समस्या तसेच वहातुककोंडी त्यामुळे होणारे अपघात या सर्व विषयावर आम्ही नक्कीच आपल्या सोबत राहू असे यावेळी सांगण्यात आले. या निषेध आंदोलनात बहुसंख्य पालक, माता पालक विद्यार्थी, शाळेतील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी,पालक संघर्ष समितीचे अध्यक्ष किरण घरत, कार्याध्यक्ष योगेश तांडेल, उपाध्यक्ष, सचीव,खजिनदार, व सर्व समिती सदस्य बहुसंख्येने उपस्थित होते. न्हावा शेवा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक बापूसाहेबओवे व त्यांचे सहकारी उपस्थित होते.

# महाराष्ट्रातील शाळांमध्ये CBSE पॅटर्न

**पान १ वरुन** अखत्यारितील 30% मध्ये छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज, ताराराणी आणि मराठा साम्राज्याचा इतिहास शिकवला जाणार असल्याची माहिती देण्यात आली आहे. यावर्षी पहिली इयत्तेला सीबीएससी अभ्यासक्रम असेल त्यानंतर दरवर्षी एकेक इयत्तेचा अभ्यासक्रम बदलला जाणार आहे. नव्या अभ्यासक्रमाची पाठ्यपुस्तके छापण्याची जबाबदारी राज्य शिक्षण मंडळाची असणार आहे. 1 जूनला शाळा सुरू झाल्यानंतर लगेच शिक्षकांना प्रशिक्षण दिले जाणार असल्याची माहितीही यावेळी देण्यात आली.

**शाळांचे वर्षभराचे वेळापत्रक यंदा कोलमडण्याची भीती**

शाळांचे वर्षभराचे वेळापत्रक यंदा कोलमडण्याची भीती व्यक्त केली जात आहे. मार्च महिन्याच्या पहिल्याच आठवड्यामध्ये शिक्षण विभागाकडून अचानक पहिल्या इयत्तेपासून नवव्या इयत्तेपर्यंतची वार्षिक परीक्षा एप्रिलअखेरीस घेण्याची सूचना जारी केली. मात्र या सुचनेमुळे शैक्षणिक वर्तुळात गोंधळ उडाल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. या परीक्षा पूर्वीच्या वेळापत्रकानुसारच व्हाव्यात, अशी शिक्षकांसह पालकांची मागणी आहे. त्यातच आता मुंबईतील शाळांमधील मुख्याध्यापकांसमोर या निर्णयामुळे नवा प्रश्न निर्माण झाला आहे. आताच्या नव्या सुचनेप्रमाणे परीक्षा संपवून नवीन शैक्षणिक वर्षातील दहावीचा अभ्यासक्रम कधी सुरू करायचा, असा प्रश्न मुख्याध्यापकांना पडलाय.अनेक शाळांमध्ये इयत्ता दहावीचे वर्ग एप्रिल महिन्यातच घेण्यास सुरु होतात. सामान्यप्रमाणे नवीन शैक्षणिक वर्ष सुरू होण्याआधी दहावीच्या मुलांचे वर्ग सुरु होतात. याच काळात दहावीच्या मुलांचा बराचसा अभ्यासक्रमही पूर्ण करतात. मात्र आता नव्या सुचनेनुसार वार्षिक परीक्षाच 22 एप्रिलपर्यंत सुरू राहणार असून त्यामुळे दहावीच्या या वर्गांचे नियोजन आता करता येणार नाही, अशी खंत शिक्षकांसह पालक आणि विद्यार्थ्यांनी व्यक्त केली आहे.

# नरसी येथे पक्षप्रवेश सोहळ्यास उपस्थित राहण्याचे आवाहन

**पान १ वरुन** माजी सभापती गणेशराव पाटील करखेलीकर, माजी सभापती रामचंद्र पाटील बन्नाळीकर, माजी उपनगराध्यक्ष रमेश तिवारी, राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष दीपक पाटील चोळाखेकर, शहराध्यक्ष नरेश रेड्डी आर्कलवार, नारायण पाटील रामपूरकर, वैभव कुलकर्णी, बालाजी पाटील आलुरकर, अशोक वडजे, विश्वंभर स्वामी, हनमंत किरोळे, योगेश पाटील, गोविंद पाटील सोनटक्के यांच्यासह अनेक कार्यकर्ते व पत्रकार उपस्थित होते. बैठकीचे सूत्रसंचालन संपादक शिवराज पाटील गाडीवान यांनी केले तर सतीश पा.शिंदे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# जिल्हा परिषद पूर्ण प्राथमिक शाळा कोतापूर न. 1 शाळेला साप्ताहिक प्रकट महाराष्ट्र आणि वृत्तवाहिनी च्या वतीने आदर्श शाळा पुरस्कार.

**दैनिक युवक आधार**
**वार्ताहर**

आदर्श शाळा ही केवळ शिक्षकांनीच घडवता येत नाही तर त्यामध्ये संपूर्ण समाजाचा सहभाग आवश्यक असतो. शिक्षक, पालक आणि ग्रामस्थ यांनी एकत्र येऊन शिक्षणाचा दर्जा सुधारला तरच विद्यार्थ्यांचे उज्वल भविष्य घडू शकते . शिक्षण हा समाजाच्या प्रगतीचा कणा आहे आणि त्याला अधिक बळकट करण्यासाठी सर्वांनी एकत्र येणे गरजेचे आहे अशा शाळेंमधून शिक्षण घेणारी मुले ही भविष्यात एक जबाबदार नागरिक होऊन समाजाच्या उन्नतीस हातभार लावतील. " विद्या हिच खरी संपत्ती आहे जी जितकी वाटली तितकी वाढते " आणि याचे ज्वलंत उदाहरण आहे राजापूर तालुक्यातील कोतापूर गाव. जिल्हा परिषद पूर्ण प्राथमिक शाळा कोतापूर नंबर एक व इतर तीन शाळेतून शिकणारे विद्यार्थी. गावातील लोक कष्टाळू आणि त्यातूनच विद्यार्थ्यांच्या शिक्षणाकडे जातीनिशी लक्ष देणारे. आणि त्यांच्या कष्टांना साथ मिळते ती येथील शिक्षक वर्गाला. कामाशी अतिशय प्रामाणिक राहून या गावखेड्यातील विद्यार्थी अनेक तालुकास्तरीय, जिल्हास्तरीय पातळीवरती अनेक क्षेत्रात नावारुपाला आणण्याचा मोलाचा वाटा असतो तो या शिक्षकांचा... सलग दोन वर्षे नासा इस्त्रोसाठी निवड झालेले विद्यार्थी हे केवळ येथील विद्यार्थी शिक्षक व पालक यांच्या खऱ्या योगदानामुळेच आणि या सर्वांच्या यशाची, मेहनतीची दखल घेतली ती प्रकट महाराष्ट्र साप्ताहिक व प्रकट महाराष्ट्र युट्युब वृत्तवाहिनीने... या सर्वांचा दिनांक 15 मार्च 2025 रोजी विद्यार्थी, शिक्षक, पालक यांचा यथोचित गुणगौरव प्रकट महाराष्ट्र साप्ताहिक व वृत्तवाहिनीचे संपादक श्री दत्ताराम दळवी साहेब, रवींद्र जाधव साहेब यांच्या वतीने करण्यात आला. प्रामुख्याने नासा इस्त्रोसाठी निवड झालेल्या विद्यार्थी शमिका शेवडे, देवयानी आग्रे आणि शिवाली घुमे, शासकीय रेखा कला प्रवीण विद्यार्थी - दिव्यराज तरळ, आशिष वालम, तेजस सुतार आणि नितेश नवाथे. जिल्हास्तरीय खोखो संघात निवड झालेला अथर्व मांडवकर, नृत्य अनुभूती नॅशनल अवॉर्ड वर्ल्ड परफॉर्मिंग चॅम्पियनशिप भरतनाट्यम मध्ये



प्राविण्य मिळवलेली शुभ्रा आंब्रे तसेच राजापूर व कणकवली तालुक्यातील तालुकास्तरीय वक्तृत्व स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावणाऱ्या रक्षा जांगळी. समूह गायन स्पर्धेसाठी.. 1) आनम महंमद मोनये. 2)श्रावणी मंगेश जाधव. 3)स्वरा सुधाकर जानस्कर. 4) मेघा दिपक जानस्कर. 5)पायल सूर्यकांत चौगुले. 6) स्वरा सुधाकर जानस्कर - वक्तृत्व स्पर्धा या विद्यार्थ्यांचा समावेश होता. सदरचा कार्यक्रम पूर्णत्वास नेण्यासाठी प्रकट महाराष्ट्राची संपूर्ण टीम, विद्यार्थी, शिक्षक पालक व ग्रामस्थ यांचे मोलाचे योगदान लाभले. या विद्यार्थ्यांचा समावेश होता... सदरचा कार्यक्रम पूर्णत्वास नेण्यासाठी प्रकट महाराष्ट्राची संपूर्ण टीम, विद्यार्थी, शिक्षक पालक व ग्रामस्थ यांचे मोलाचे योगदान लाभले.

# अवकाळी पावसाने ज्वारी हरभरा गव्हाचे नुकसान तर आंब्याच्या कैर्‍याचा सडा पडला...

**दैनिक युवक आधार**
**प्रशांत तांबोळकर लातुर**
**शिरूरआनंतपाळ** :

होत्याचं नव्हतं झालंय,अन् अवघ्या अर्धा ते पाऊण तास झालेल्या वादळी वाऱ्यासह मूसळधार अवकाळी पाऊस झाल्याने शेतकरी हवालदिल झाला आहे. हातातोंडाशी आलेला घास गुरुवारी पडलेल्या अवघ्या काही तासात पडलेल्या अवकाळी पावसाने हिरवल्याने शेतकरी पुन्हा अडचणीत आला आहे. शिरूरआनंतपाळ तालुक्यातील येरोळसह काही भागात गुरुवारी सायंकाळी विजेच्या कडकडाट,वादळी वाऱ्यासह मुसळधार पाऊस झाला.या पावसात हातातोंडाशी आलेला घास हिरवल्याने शेतकरी चिंतेत पडला आहे. तालुक्यातील येरोळ सह नागेवाडी, दैठना, डिगोळ,



सुमठाना, साकोळ, चामरगा, बोळेगाव, कारेवाडी तळेगाव, आजणी यासह काही गावात वादळीवाऱ्यासह जोरदार अवकाळी पावसाची बॅटिंग झाल्याने मोठ्या प्रमाणात शेतपिकांचे नुकसान झाले आहे. वादळीवाऱ्यासह मोठा पाऊस झाल्याने गहू,हरभरा ज्वारी पीक जमिनीवर लोटून जमीनदोस्त झाला.तर आंबा बागेतील फळ जमिनीवर पडल्याने शेतकऱ्याच्या हातातोंडाशी आलेला घास अवकाळी पावसाने हिरवला आहे. अवकाळी पावसाने 40 ते 50 टक्के आंबा जमिनीवर पडल्याने शेतकरी चिंतेत सापडला आहे. तातडीने या पिकांचे महसूल विभागाकडून पाहणी करून पंचनामे करण्यात यावे. राज्य सरकारने शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदत करण्याची मागणी आंबा उत्पादक शेतकरी गुंडेराव चौसष्टे व सुधीर येरोळकर यांच्यासह शेतकरी करत आहे.

# ! मानव जीवनात पाणी हेच अमृत !

**(22 मार्च: जागतिक पेय जल दिवस विशेष.)**

_स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त संत निरंकारी मिशन मार्फत देशभर राबवण्यात येत असलेल्या अमृत परियोजने अंतर्गत रविवार दि.२६ फेब्रुवारी २०२४ रोजी देशभरात सुमारे ११०० पेक्षा अधिक ठिकाणी "स्वच्छ जल स्वच्छ मन" अभियान राबवण्यात आले. या अभियानांतर्गत नदी परिसरात स्वच्छता मोहीम राबवण्यात आली. या स्वच्छता मोहीमेत नदीपात्र, पाणवठे व पाणी स्वच्छ करण्यात आले. या मोहीमेत हजारो निरंकारी संत व सेवादलाचे बंधुभगिनी सहभागी झाले होते. स्वच्छ जल आणि जल रक्षणाप्रति समर्पित अशी ही मोहीम आहे. ती दरवर्षी राबविण्यात येत आहे. या लोककल्याणकारी मोहिमेचे व कार्याचे जगभरातून कौतुक होत असते. अशा मोहिमेत सामान्य जनतेनेही सहभाग घेऊन आपला खारीचा वाटा उचलायला काय हरकत आहे? श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजींचा सदर प्रेरणादायी संकलित लेख... संपादक._

उन्हाळा सुरु झाला कि सर्वत्र पाण्याच्या तुटवड्याचे संकेत निर्माण होतात, जगामध्ये आजही पाण्याचे संकट सुरू आहे. असा एकही प्रदेश नसेल जेथे पाण्याची कमतरता भासत नाही. आजही लोकांना पिण्यासाठी शुद्ध पाणी मिळताना वणवण फिरावे लागते. असं तुम्ही कित्येकदा ऐकले असेल, भविष्यामध्ये पाण्यासाठी महायुद्धही होऊ शकते. एवढे सजीवांना पाण्याची आवश्यकता आहे. परंतु, दिवसेंदिवस मानव पाण्याचे महत्त्व विसरत चालला आहे, ज्यामुळे आज पाणी टंचाईच्या संकटाला जग सामोरे जात आहे. प्रत्येकाच्या जीवनातील पाण्याचे महत्त्व समजावून सांगण्यासाठीच जागतिक पेय जल दिन साजरा करायला सुरूवात झाली म्हणायला हरकत नाही. संयुक्त राष्टाचे सदस्य असलेल्या देशांकडून दरवर्षी हा दिवस आवर्जून साजरा केला जातो. तसेच दरवर्षी एक नवी संकल्पनाही या दिवसासाठी मांडली जाते. वर्षभर या संकल्पनेस अनुसरून विविध उपक्रम राबवले जातात. यावर्षीची जागतिक जल दिनाची थीम वेल्यूइंग वाटर ही आहे. दि.२२ मार्च १९९२ रोजी प्रथम जागतिक जल दिन साजरा केला गेला. संयुक्त राष्ट्रांच्या पर्यावरण आणि विकासाच्या परिषदेत हा दिवस साजरा करण्याचा निर्णय ब्राझील मधील रिओ दि जानेरो येथे घेण्यात आला. संयुक्त राष्ट्रसंघाने सन १९९३ साली महासभेत हा दिवस वार्षिक कार्यक्रम म्हणून साजरा करण्याच्या निर्णयावर शिक्कामोर्तब केला. पृथ्वीवर ७० टक्क्यांहून अधिक प्रमाण पाण्याचे आहे. पण सरासरी पाहता गोड्या पाण्याचे- पेय जलाचे प्रमाण क्षारयुक्त पाण्यापेक्षा खूपच कमी आहे. क्षारयुक्त पाण्याची टक्केवारी ही ९७.३ इतकी आहे, परंतु हे पाणी पिण्यास योग्य नाही. मुंबईसारख्या मेट्रो शहरांमध्ये दररोज गाड्या धुण्यासाठी लागणाऱ्या पाण्यावर साधारण ५० लाख लिटर पाणी खर्च होते. त्याचप्रमाणे मुंबई, दिल्ली, आणि चेन्नईसारख्या शहरांमध्ये पाईपलाईन दुरुस्ती करताना अथवा खराब झाल्यामुळे ४० टक्क्यांपर्यंत पाण्याचा अपव्यय होतो. काही ठिकाणी पाणी टंचाईमुळे पिण्याच्या पाण्यासाठी महिलांना वणवण फिरावे लागते. घरी सकाळी ब्रश करताना नळा चालू ठेवला असता पाच मिनिटांमध्ये अनेक लिटर पाणी सहज वाया जाते. शरीर निरोगी राहण्यासाठी प्रत्येक व्यक्तीस दररोज पिण्यासाठी ३ लिटर पाण्याची आणि तसेच जनावरांसाठी साधारण ५० लिटर पाण्याची आवश्यकता भासते. एक किलो गहू पिकवण्यासाठी एक हजार लिटर तर एक किलो तांदूळ उगवण्यासाठी चार हजार लिटर पाण्याची आवश्यकता भासते. अशाप्रकारे विविध गोष्टींद्वारे आपल्याला जीवनामध्ये पाण्याचे अत्यंत महत्त्व आहे. पाण्यासंदर्भात अशा अनेक गोष्टी आहेत, ज्याची कल्पना कदाचित आपल्याला नसेलही. परंतु, योग्य वेळी पाण्याचं महत्त्व न जाणल्यास भविष्यात येणाऱ्या पाण्याच्या समस्येसाठी तयार राहणे गरजेचं आहे. त्यामुळे आत्तापासूनच पाण्याची समस्या भविष्यात उद्‌भवणार नाही याची काळजी घेणे आवश्यक आहे. भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त संत निरंकारी मिशन मार्फत देशभर राबवण्यात येत असलेल्या अमृत परियोजने अंतर्गत रविवार दि.२६ फेब्रुवारी २०२४ रोजी देशभरात सुमारे ११००पेक्षा अधिक ठिकाणी "स्वच्छ जल स्वच्छ मन" अभियान राबवण्यात आले. या अभियानांतर्गत नदी परिसरात स्वच्छता मोहीम राबवण्यात आली. या स्वच्छता मोहीमेत नदीपात्र, पाणवठे व पाणी स्वच्छ करण्यात आले. या मोहीमेत हजारो निरंकारी संत व सेवादलाचे बंधुभगिनी सहभागी झाले होते. स्वच्छ जल आणि जल रक्षणाप्रति समर्पित अशी ही मोहीम आहे. ती दरवर्षी राबविण्यात येत आहे. या लोककल्याणकारी मोहिमेचे व कार्याचे जगभरातून कौतुक होत असते. अशा मोहिमेत सामान्य जनतेनेही सहभाग घेऊन आपला खारीचा वाटा उचलायला काय हरकत आहे?

पाण्याची आवश्यकता भासत नाही असे कोणतेच क्षेत्र पृथ्वीतलावर आढळणे अशक्य आहे. परंतु, काही दशकांपासून पाण्याचा होणारा अयोग्य अविचारी आणि अतिरिक्त वापर हा भविष्यात भासणाऱ्या पाण्याच्या समस्येचे संकेत देत असल्याचे जाणवते. निसर्गातील गोड्या म्हणजेच पिण्यायोग्य पाण्याचे स्त्रोत प्रमाण अगदीच तुटपुंजे असल्याने त्याचा अत्यंत विचारपूर्वक जपून वापर करणे, त्याच्या स्त्रोतांचे योग्यरित्या संवर्धन करणे गरजेचे आहे. भविष्यामध्ये पुरेसे पाणी मिळण्यासाठी तिसरे महायुध्द होण्याचीही शक्यता मानली जात आहे, इतके पाण्याचे महत्त्व सर्वांच्या जीवनामध्ये आहे. तहान लागल्यावर विहीर खणायला गेल्याने कोणतेच प्रश्न सुटत नाही. त्यासाठी सर्व गोष्टींचे पूर्वनियोजन करणे अत्यावश्यक आहे. त्यामुळे सद्यस्थिती पाहता पाण्याचा योग्य प्रमाणत आणि आवश्यक तितकाच वापर करणे फायदेशीर ठरेल. त्यासाठी नेसर्गिकरित्या उपलब्ध असेलल्या पाण्याच्या स्त्रोताची योग्य निगा राखणे, तो कोणत्याही कारणास्तव दूषित न होणे याची काळजी घेणे आवश्यक आहे. पिण्याचे पाणी सर्वांनाच गरजेप्रमाणे उपलब्ध होणे गरजेचे आहे. स्वतःला रोज खरोखर किती पाण्याची गरज आहे हे समजून घेऊन आवश्यकतेनुसारच पाणी प्रत्येकाने वापरले पाहिजे. तरच भविष्य उज्ज्वल राहील.

!! विश्व पेय जल दिनाच्या सर्वांना
**सजगतेसंबंधी हार्दिक शुभेच्छा !!**
**- संकलन व सुलेखन -**
**श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी.**
**रामनगर वॉर्ड, गडचिरोली.**

# लांब पल्ल्याच्या एस.टी.ला नागोठणे स्थानकाशी वावडे ; रूसलेली लाल परी शहरात प्रवेश करेनात

**प्रवाशांची होत आहे पायपिटसह हाल ; रात्री अपरात्री दहशतीची भीती**





**दैनिक युवक आधार**
**नागोठणे वार्ताहर**

एसटी स्थानकाशी लांब पल्ल्याच्या लाल परीला (एस.टी.) बसेसचे वावडे असून या रूसलेल्या बसेस शहरात प्रवेश करीत नाहीत. सदरील बसेस शहराच्या बाहेर महामार्गावर थांबत असल्याने अबालवृध्दांसह विद्यार्थी व प्रवाशांना साधारण एक दीड किलो मीटर पायपीट करावी. तसेच रात्री अपरात्री प्रवास करून महामार्गावर उतरून शहरात येणाऱ्या प्रवाशांची वाटेत लूटमार होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी सदरील बसेस शहरात आणण्याची मागणी प्रवाशी वर्ग करीत आहेत. नागोठणे हे शहर औद्योगिक क्षेत्र तसेच येथील एस.टी.स्थानक म्हणजे राज्य परिवहन मंडळाचे मध्यवर्ती ठिकाण. या ठिकाणी अनेक कंपन्या असून येथील कामगार तसेच शहरातून कामानिमित्त मुंबई, श्रीवर्धन,महाड - पोलादपूरसह कोकणात गावी जाण्यासाठी प्रवास करणाऱ्या प्रवाशांची संख्या मोठी आहे.पूर्वी सर्व लांब पल्ल्याच्या गाड्या या स्थानकामध्ये ये - जा करीत असत. आता तर सर्वच लांब पल्ल्याच्या आगारातून भरपूर बसेस सदरील मार्गावरुन सोडल्या जात असल्या तरीही कोरोना काळात सर्व वाहतूक बंद होती. त्यानंतर वाहतूक पूर्व पदावर झाल्यापासून सदरील बसेस शहरात येण बंद झाल्या,तेव्हा पासून येथील प्रवाशांची कुचंबना होत आहे. पर्यायी मार्ग म्हणून त्यांना साधारण एक दीड किलो मीटर पायपीट करीत शहरा बाहेरील प्राथमिक आरोग्य केंद्राजवळील मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गावरून बसेस पकडावी लागते. तेथेही सर्वच बसेस थांबतातच असे नाही काही काही बसेस तर समोर प्रवाशी हात दाखवत उभे असले तरीही दुर्लक्ष करीत बस पळवत असतात.(अधीकृत थांबा असताना देखील) बराच वेळ वाट बघितल्यावर एकाद्या बसमध्ये नागोठणे येथे उतरणारा प्रवाशी असला तर बस थांबते व मास्तर आरोळी देतो, बसायला जागा नाही, अमुक अमुख ठिकाणी बस जेवायला थांबणार आहे. नाईलाजस्तव प्रवाशी बसमध्ये चढतात.कारण वेळेवर बस न मिळाल्याने पुढे मुंबई,पनवेल कडून परराज्यात जाणारी बस किंवा रेल्वे चुकण्याची भीती अधिक असते. तसेच या ठिकाणी प्रवाशांसाठी कोणत्याही प्रकारची निवारा शेड नसल्याने वयोवृध्द,लहान मुले,महिलांसह शाळा- कॉलेज विद्यार्थ्यांना उन्हाळ्यात कडक उन्हात तर पावसाळ्यात मुसळधार पावसात उभे राहावे लागते. त्याच प्रमाणे मुंबई किंवा कोकणातून कोणी प्रवाशी रात्री अपरात्री या ठिकाणी उतरला तर शहरात येण्यासाठी रीक्षा मिळणे मुश्किल होते; जर का मिळालीच तर त्याचे भाडे सर्वसामान्य लोकांना न परवणारे असते.शिवाय चालत यायचं तर रस्त्यावरील भटक्या कुत्र्यांच्या दहशतीसह चोरांकडून लूटमार होण्याची भीती अधिक असते. या सर्व समस्यांना येथील प्रवाशांना सामोरे जावे लागते. यातून सुटका होण्यासाठी लांब पल्ल्याच्या सर्व बसेस पूर्वी सारख्या शहरात येणे गरजेचे असल्याने त्या बसेस शहरात आणण्याची मागणी प्रवाशी वर्गांकडून जोर धरत असून येथील स्थानिक लोक प्रतीनिधींनी (कदाचित ते बसने प्रवास करीत नसल्याने) लक्ष देत नसले तरीही संबंधित अधिकारी याकडे निश्चित लक्ष देतील असा विश्वास येथील प्रावाशांना आहे. अपघात होण्याची भीती - महामार्गावरून बस पकडण्यासाठी मुंबईकडील सर्व प्रवाशी नागोठणे फाटा तर कोलाडकडे कडील सर्व प्रवाशी पलीकडे उभे असतात,दोन्ही ठिकाणे हे वळणावर असल्याने भरधाव वेगात येणाऱ्या गाड्यांना उभे असलेले किंवा रस्ता ओलांडत असलेले प्रवाशी तसेच प्रवाशांना आलेली वाहने दिसत नसल्याने तसेच ही समस्या रात्री अपरात्री उतरणाऱ्या प्रवाशांमध्ये जास्त प्रमाणात असल्याने त्या ठिकाणी अपघात होण्याची शक्यता असून, अपघात झाल्यास जबाबदार कोण ? असा सवाल प्रवाशी विचारत आहेत. लाडक्या बहीणींची खंत - रात्री अपरात्री एकटी महिला प्रवास करीत असेल व तिने गाडी नागोठणे शहरातील एस.टी. स्थानकात नेण्याची विनंती केली तर वाहकाची नकार घंटा ऐकायला मिळत असून गाडी आत जात नाही आम्ही तुम्हाला महामार्गावरील नागोठणे फाटा येथेच उतरविणार असल्याबाबतच्या प्रतिक्रिया लाडक्या बहिंणीकडून ऐकायला मिळत आहे. लांब पल्ल्याच्या बसेस शहरात येणे गरजेचे - नागोठणे स्थानकात कोरोना महामारी पूर्वी पनवेल,मुंबईकडे जाण्यासाठी महाड आगार - 08, श्रीवर्धन आगार -07,माणगाव आगार -18 अशा साधारण 33 ते 35 बसेस तसेच मुंबई पनवेल कडून 33 ते 35 बसेस यायच्या. कोरोना काळानंतर पनवेलकडे जाण्यासाठी आजपर्यंत महाड आगार - एकही बस नाही, श्रीवर्धन आगार - 02, माणगाव आगार - 08 अशा साधारण 10 ते 12 बसेस,मुंबई कडून महाड आगार - एकही बस नाही, श्रीवर्धन आगार - 01,माणगाव आगार - 03 अशा साधारण 04 ते 05 बसेस येतात. यासर्व साध्या बसेस असून शिवशाही,सेमी लक्झरी,रातराणी तसेच कोकणातून येणाऱ्या बसेसचा समावेश नाही. येथून पनवेलकडे पहिली बस सकाळी 06.30 वा. रोहा धुळे व संध्याकाळी शेवटची बस 07.00 वा.रोहा मुंबईकडून पहिली बस सकाळी 8.15 वा बोरीवली महाड (माणगाव आगार) व शेवटची बस रात्री 08.30 वा. पनवेल रोहा येत असते. त्यानंतर कोणतीही बस नागोठणे स्थानकात येत नाही. दिवसभरात मुंबई व माणगाव बाजुकडे जाणाऱ्या बसेसची शेकडो प्रवाशी चौकशी / विचारणा करीत असतात.

**प्रसाद पाटील - वाहतूक नियंत्रक, नागोठणे एस.टी. स्थानक**

नागोठणे स्थानकात सर्व बसेस येणे गरजेचे- नागोठणे स्थानकात शिवशाही व स्लीपर बस वगळता बाकीच्या सर्व बसेस येणे गरजेचे आहे.याबाबत सर्व आगार नियंत्रक (मॅनेजर ) यांना सर्व गाड्या परस्पर महामार्गावरून न नेता नागोठणे स्थानकात नेण्याबाबत पत्र व्यवहार करून सूचना देण्यात आलेल्या आहेत. तरीही ज्या बसेस नागोठणे स्थानकात येत नाहीत याची चौकशी करण्यात येईल.

**दीपक घोडे - रायगड विभाग नियंत्रक,**
**एस.टी.महामंडळ, रायगड**

दैनिक युवक आधार (RNI NO :- MAHMAR/2023/89514) हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR (RNI NO :- MAHMAR/2023/89514) Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST-RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

**द•ख•ल**

## खारघर चीं ' दारुमुक्त' शहर म्हणून ओळख कायम राहावी,मद्यविक्री परवाने तातडीने रद्द करा - आ. विक्रांत पाटील यांची विधिमंडळात मागणी

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, (वार्ताहर)**



: पनवेल महापालिका क्षेत्रातील खारघर शहर हे दारुमुक्त शहर म्हणून ओळखले जाते, शहराच्या निर्मिती पासून आजपर्यंत दारू मुक्त शहर म्हणून ही ओळख कायम राखण्यात नागरिकांना आणि प्रशासनाला यश आले होते. परंतु आता काही धन दांडग्यानी या गोष्टीला गालबोट लावण्याचा प्रयत्न सुरु केला आहे. या ज्वलंत विषयात आवाज उठवत सध्या सुरु असलेल्या मुंबई येथील अर्थ संकल्पीय अधिवेशनात आमदार विक्रांत पाटील यांनी सभागृहाचे लक्ष वेधून घेतले. हा परिसर स्वच्छ, सुंदर आणि सर्व मूलभूत सोयींनी सुसज्ज असून, शैक्षणिक हब म्हणून ओळखला जातो. येथे भारती विद्यापीठ, सरस्वती इंजिनिअरिंग कॉलेज, ए. सी. पाटील इंजिनिअरिंग कॉलेज व यांसारख्या अनेक प्रतिष्ठित शैक्षणिक संस्थांचा समावेश आहे व त्यामध्ये मोठ्या प्रमाणावर तरुणाई शिकत आहे.या सर्व युवा शक्तीच्या भवितव्यासाठी आणि खारघर वासियांच्या भावना लक्षात घेता या भागात मद्य विक्री परवाने दिले जाऊ नये व दिलेले परवाने तातडीने रद्द करावे ही मागणी आ. विक्रांत पाटील यांनी केली.

यापूर्वीही काही समाजकंटकांनी खारघर परिसरात अवैध दारू विक्री करण्याचा प्रयत्न केला होता मात्र, स्थानिक नागरिकांनी संघर्ष समितीच्या माध्यमातून या प्रयत्नांना तीव्र विरोध करून हा कट उधळून लावला होता. खारघर शहर दारूमुक्त असावे असा ठराव पनवेल महानगरपालिकेच्या महासभा सभागृहात सुद्धा करण्यात आला. आमदार विक्रांत पाटील यांच्या या दारू विक्री विरोधी भूमिकेचे खारघरवासीयांकडून मोठ्या प्रमाणावर स्वागत करण्यात येत आहे. अनेक सामाजिक संस्था, विद्यार्थी, पालक आणि रहिवाशांनी या मागणीला पाठिंबा दर्शवला आहे.

## शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्ष नवीन पनवेल शहर शाखेच्या वतीने शिवजयंती निमित्त विविध कार्यक्रम संपन्न

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, (वार्ताहर)**



शिवसेना( उद्धव बाळासाहेब ठाकरे ) नविन पनवेल शहर शाखेच्या वतीने शहर प्रमुख यतिन देशमुख यांच्या नेतृत्वात दरवर्षी प्रमाणे छत्रपती शिवाजी महाराज जयंती 2025 साजरी करण्यात आली. महिलांसाठी हळदीकुंकू आणि होम मिनिस्टर कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी पनवेल मनपाचे विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे, विधानसभा संघटक दिपक निकम, विधानसभा समन्वयक प्रदीप ठाकूर,युवासेना जिल्हा प्रमुख पराग मोहिते,शिवसेना महानगर प्रमुख अवचित राऊत, तालुका प्रमुख ज्ञानेश्वर बडे, महानगर संघटक दिपक घरत, शिवसेना पनवेल शहर प्रमुख प्रवीण जाधव ,अजय गोयाजी ,उपजिल्हा संघटिका रेवती सकपाळ , उपशहर मालती पिंगळा , विभाग प्रमुख किरण सोनावणे, बिपीन झुरे, शाखा प्रमुख संदेश बन्ने, मृण्मय काणे, गोविंद जोग , संजय भोसले, प्रवीन चोनकर, विकास पोवळे, ओमकार धावडे , वैशाली थळी, तनुजा झुरे, आदि मान्यवर उपस्थित होते.

## तीनचाकी प्रवासी वाहनांकरीता एम एच 46 सीवाय ही मालिका सुरू

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल**

प्रादेशिक परिवहन कार्यालय, पनवेल यांच्या कार्यकक्षेमधील वास्तव्य करणाऱ्या तथा व्यवसायाचा पत्ता असलेल्या व परिवहनेतर संवर्गात वाहन नोंदणी करू इच्छिणाऱ्या वाहन धारकांकरीता वाहन 4.0" या संगणक प्रणालीवर सद्यस्थितीत कार्यन्वित असणारी एम एच 46 बीपी ही मालिका संपुष्टात येणार असल्याने एम एच 46 सीवाय ही नवीन मालिका सुरू करण्यात येणार असल्याची माहिती उप प्रादेशिक परिवहन अधिकारी पनवेल जयंत चव्हाण यांनी दिली आहे. महाराष्ट्र मोटार वाहन नियम 1989 च्या नियम 54 (अ) अन्वये नवीन नोंदणी मालिकेतील आकर्षक व पसंतीचे नोंदणी क्रमांकासाठी अर्ज करून सदर क्रमांक आरक्षित करण्यासाठी ईच्छूक नागरीकांकडून 24 मार्च 2025 रोजी सकाळी 10 ते दुपारी 1 या कार्यालयीन वेळेमध्ये अर्ज स्विकारले जातील. तसेच आकर्षक व पसंतीचे नोंदणी क्रमांक आरक्षित करण्यासाठी प्रतिनिधी असतील तर संबंधीत प्रतिनिधीस प्राधिकृत केल्याबाबतचे विहीत प्राधिकारपत्र अर्जासह सादर करणे बंधनकारक आहे.

# महानगर गॅस लिमिटेडच्या 'एम जी एल आरोग्य प्रोग्राम''या सीएसआर प्रकल्पा अंतर्गत

### महिलांसाठी गर्भाशयमुखाच्या कर्करोगाची मोफत तपासणी कार्यक्रमाचा वार्षिक समारोप समारंभ नील हॉस्पिटल येथे संपन्न

**दैनिक युवक आधार सहसंपादक**
**मुकुंद कांबळे**

महानगर गॅस लिमिटेडच्या "एम जी एल आरोग्य प्रोग्राम" या सीएसआर प्रकल्पा अंतर्गत महिलांसाठी गर्भाशयमुखाच्या कर्करोगाची मोफत एचपीव्ही डीएनए चाचणी कार्यक्रमाचा वार्षिक समारोप समारंभ नील हॉस्पिटल, नवीन पनवेल येथे २० मार्च रोजी संपन्न झाला. सायन्स अण्ड टेक्नॉलॉजी पार्क, पुणे द्वारे या कार्यक्रमा ची अंमलबजावणी करण्यात आली. महानगर गॅस लिमिटेडच्या एम जी एल आरोग्य प्रोग्राम या सीएसआर प्रकल्पा अंतर्गत आयुजेन बायोसायांसेस ची एचपीव्ही डीएनए चाचणी १००० महिलांसाठी ,ऑक्टोंबर - डिसेंबर या कालावधीत



नील हॉस्पिटल नविन पनवेल व इतर ठिकाणी मोफत करण्यात आली. 30 वर्षे व त्या पेक्षा जास्त वयावरील महिलांची एचपीव्ही टेस्ट करण्यात आली. या टेस्टने गर्भाशयमुखाच्या कर्करोगाचा प्रतिबंधक करता येतो. ही टेस्ट करण्यासाठी 3 हजार रुपये खर्च असतो. एचपीव्ही टेस्ट पॉझिटिव्ह आलेल्या महिलांची मोफत ट्रिटमेंट नील हॉस्पिटल नविन पनवेल येथे करण्यात आली. डॉ गिरीश गुणे, IMA अध्यक्ष व प्रसिद्ध शल्य चिकित्सक व बीके डॉ. शुभदा नील प्रसिद्ध स्त्रीरोग, कॅन्सर आणि गर्भ संस्कार तज्ञ, नील हॉस्पिटल यांच्या हस्ते मा. श्री. सुसांता कुमार राउत मुख्य व्यवस्थापक - सी एस आर महानगर गॅस लिमिटेड यांचा सत्कार करण्यात आला. श्री. सुसांता कुमार राउत यांनी सर्व कॅम्प आयोजकांचा सत्कार केला. गर्भाशय मुखाचा कर्करोग टाळू शकतो का? - यावर बीके डॉ शुभदा नील यांनी मोलाचे मार्गदर्शन केले. या कार्यक्रमा साठी अध्यक्ष मा. श्री. सुसांता कुमार राउत मुख्य व्यवस्थापक - सी एस आर महानगर गॅस लिमिटेड । प्रमुख अतिथी बीके डॉ. शुभदा नील प्रसिद्ध स्त्रीरोग, कॅन्सर आणि गर्भ संस्कार तज्ञ, नील हॉस्पिटल । प्रमुख मान्यवर श्री. मनीष पुंगलिया, संचालक आयुजेन बायोसायन्सेस । संयोजक श्री. वैभव निमगिरे सहाय्यक व्यवस्थापक सायन्स अँड टेक्नॉलॉजी पार्क, पुणे ।श्री. अभय वैद्य विपणन व्यवस्थापक आयुजेन बायोसायन्सेस । डॉ गिरीश गुणे, IMA अध्यक्ष व प्रसिद्ध शल्य चिकित्सक । डॉ पी बी नील, नील हॉस्पिटल संचालक । राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त मंगला गडमुळे । डॉ अपर्णा पवार तालुका आरोग्य अधिकारी पनवेल । डॉ वैभव मोकल, अध्यक्ष जनरल प्रॅक्टिशनर असोसिएशन, नील हॉस्पिटल स्टाफ, कॅम्प आयोजक व इतर मान्यवर उपस्थित होते.

## हिंदु संस्कृती जपण्याचे काम गेल्या अनेक वर्षापासून शिवशक्ती मित्र मंडळामार्फत केले जात आहे : रायगड भूषण

**रमेश गुडेकर**
**दैनिक युवक आधार**
**पनवेल, (वार्ताहर)**

हिंदु संस्कृती जपण्याचे काम गेल्या अनेक वर्षापासून शिवशक्ती मित्र मंडळामार्फत केले जात आहे. यासाठी सातत्याने परिसरात हिंदु सण, उत्सव सर्वजण एकत्रित येवून मोठ्या उत्साहात साजरा करतात. हेच या मंडळाचे वैशिष्ट्य असल्याचे मत मा.नगरसेवक व रायगड भूषण, मंडळाचे संस्थापक अध्यक्ष रमेश गुडेकर यांनी बक्षिस समारंभ कार्यक्रमाच्या वेळी व्यक्त केले. या कार्यक्रमास डॉ.अजिंक्य प्रकाश पाटील, उद्योजक राजाभाऊ गुप्ते, ज्येष्ठ पत्रकार व जनता दल सेक्युलर पक्षाचे प्रदेश चिटणीस सुनिल पोतदार, पत्रकार व रायगड प्रेस क्लब जिल्हा सल्लागार संजय कदम, युवा उद्योजक स्वप्निल गुप्ते, ज्येष्ठ शिवसैनिक अरुण ठाकूर, अध्यक्ष संदीप पाटील, रवी (पिंट्या )गोरे, मा.नगरसेविका श्रीमती नीता प्रदीप नरसाळे, शहर संघटीका अर्चना कुलकर्णी, सौ. पूजा पंकज पडवळ आदी मान्यवर व्यासपिठावर उपस्थित होते. यावेळी बोलताना गेल्या अनेक वर्षापासून शिवशक्ती मित्र मंडळ सातत्याने समाजोपयोगी कार्यक्रम करीत आहे. त्यामुळे मोठ्या प्रमाणात तरुण पिढी येथे आकर्षित झाली असून ते प्रत्येक कार्यक्रमात सहभाग घेत असल्याचे त्यांनी सांगितले. तर उद्योजक राजाभाऊ गुप्ते यांनी सुद्धा मंडळाचे कौतुक करून हे मंडळ म्हणजे पनवेलचा जिता-जागता




इतिहास आहे. येथे प्रत्येक सण, उत्सव साजरे केले जातात व त्यात सर्वांचा सहभाग असतो हे महत्वाचे असल्याचे त्यांनी सांगितले. तर जनता दल सेक्युलर पक्षाचे चिटणीस सुनील पोतदार यांनी सांगितले की, राजकारण विरहित हे मंडळ असून आमचे पक्ष वेगवेगळे असले तरी रमेश गुडेकर, अरुण ठाकूर यांची मैत्री ही जुनी आहे. त्यामुळे प्रत्येकाच्या अडीअडचणीला आम्ही धावून जात असतो असे त्यांनी सांगितले. तर रायगड प्रेस क्लबचे सल्लागार संजय कदम यांनी सुद्धा या मंडळाचे कौतुक करून पत्रकारितेच्या माध्यमातून या मंडळाची कार्य नेहमीच समाजापुढे आम्ही आणत असतो. यापुढे सुद्धा त्यांनी अशाच प्रकारे समाजोपयोगी कार्यक्रम करावेत अशा शुभेच्छा दिल्या. तर युवा उद्योजक स्वप्नील गुप्ते यांनी सुद्धा या मंडळाचे कौतुक करताना तरुण पिढीला नोकरी व्यवसायासाठी कोणतीही मदत करण्यासाठी आपण सदैव तयार असल्याचे त्यांनी सांगितले. दरवर्षीप्रमाणे यंदाही सामाजिक कार्यात अग्रेसर असणार्या लाईन आळी येथील शिवशक्ती मित्र मंडळातर्फे होळी तसेच शिवजयंती निमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विविध स्पर्धा घेण्यात आल्या. त्याचा बक्षिसाचा समारंभ मान्यवरांच्या उपस्थितीत व हस्ते करण्यात आला. त्याचप्रमाणे महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी मंडळाचे संस्थापक अध्यक्ष मार्गदर्शक रमेश गुडेकर, संस्थेचे अध्यक्ष संदीप पाटील, उपाध्यक्ष रवि (पिंट्या) गोरे, कार्याध्यक्ष खंडेश धनावडे, समीर कदम, सहकार्याध्यक्ष प्रकाश (नानु) वाघे, सहकार्याध्यक्ष प्रवीण पोवार, खजिनदार संतोष तळेकर, हिशोब तपासनीस अरुण ठाकूर, संयुक्त चिटणीस प्रशांत नरसाळे, सहखजिनदार अनिकेत जाधव आदींनी विशेष मेहनत घेतली.

## विद्युत डीपी/ट्रांसफार्मरवर बसवले मीटर, वीज चोरीवर बसणार अंकुश

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

पनवेल तालुक्यातील विद्युत डीपींवर मीटर बसवण्यात आल्याने वीज चोरीवर अंकुश ठेवला जाणार आहे. पनवेलमधील वीज चोरीवर आता लक्ष ठेवले जात आहे. तालुक्यातील सगळ्या ट्रान्सफॉर्मरवर मीटर लावण्यात येत आहेत. मीटर लावल्यामुळे होणाऱ्या चोरीवर लक्ष ठेवले जाणार आहे. ट्रांसफार्मरवर मीटर लावल्यामुळे विजेचा वापर किती होतो याची माहिती मिळेल तसेच संबंधित ट्रांसफार्मर मधून किती ग्राहक जोडले आहेत आणि त्यांचा वापर किती होतो आणि चोरी किती होते याची माहिती मिळेल. त्यानंतर याच माहितीच्या आधारे अचानक महावितरणचे अधिकारी छापा टाकू शकतात. त्यामुळे वीज चोरीवर लगाम लागू शकतो. ट्रांसफार्मरच्या मीटर वरील रीडिंग आणि त्या ट्रांसफार्मरवर असलेल्या एकूण ग्राहकांच्या मीटर मधील युनिटमध्ये जास्त अंतर असेल तर त्या ठिकाणी चोरी होते हे महावितरणच्या निदर्शनास येईल. त्यामुळे हे मीटर महावितरणला फायदेशीर ठरणार आहेत.



आजही वीज चोरी मोठ्या प्रमाणात केली जाते. मीटरमध्ये छेडछाड करून ही विजेची चोरी केली जाते. अनेकदा महावितरणचे कर्मचारी विजेची चोरी पकडतात. यावेळी त्यांना मारहाण देखील केली जाते. महावितरणचे अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना मारहाण करू नये असे आवाहन वारंवार केले जाते. मारहाण करणाऱ्यांवर गुन्हे देखील दाखल होतात.

# चऱ्हाटा प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वीज जोडणीसाठी '१० लक्ष रुपयांचा निधी''सीईओ आदित्य जीवने कडुन मंजूर

### जलसमाधी आंदोलनाचे यश :- डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर

**दैनिक युवक आधार**
**पाटोदा (प्रतिनिधी) -**

बीड तालुक्यातील चऱ्हाटा येथील प्राथमिक आरोग्य केंद्र गेल्या आठ वर्षापासून पाच कोटी रुपये खर्चून बांधण्यात आले असून सुरुवाती पासून वीज जोडणी अभावी प्राथमिक आरोग्य केंद्राची इमारत शोभेची वस्तू बनली असून प्राथमिक आरोग्य केंद्रात सुविधांचा अभाव आहे. त्या मुळे वीज जोडणी साठी निधी देण्यात यावा या मागणीसाठी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वात दि.१४ आक्टोबर रोजी चऱ्हाटा प्राथमिक आरोग्य केंद्रासमोरील साठवण तलावात जलसमाधी आंदोलन करून मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड




आदित्य जीवने यांची प्रत्यक्ष भेट घेत निधीची मागणी केली होती. तेव्हा गांभीर्याने याचा विचार करून लवकरच निधीची उपलब्धता करून देण्यात येईल असे आश्वासन दिले होते. त्याचीच दखल घेत अखेर मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड आदित्य जीवने यांनी चऱ्हाटा येथील प्राथमिक आरोग्य केंद्र ईमारत व कर्मचारी निवासस्थान यांच्या विद्युतीकरणा साठी विद्युत रोहित्र ( डी.पी.) बसविणे कामासाठी जिल्हा वार्षिक योजना सन२०२४- २०२५ अंतर्गत १० लाख रुपयांच्या निधीची तरतूद अग्नि सुरक्षा यंत्रणा खरेदी, दुरूस्ती, विस्तारीकरण व देखभाल, प्राथमिक आरोग्य केंद्र/उपकेंद्र दुरुस्ती व परीक्षण, पीट बरीयल बांधकाम (लेखाशिर्ष -२२१०। ०९४-३१) अंतर्गत उपलब्ध होणाऱ्या तरतुदींच्या अंतर्गत करण्यात आली आले. त्या मुळे अखेर वीज जोडणी नंतर रूग्णांची हेळसांड थांबणार असुन बीडला उपचारासाठी लागणार आर्थिक भुर्दंड सहन करावा लागणार नाही या बद्दल आंदोलनकर्ते व ग्रामस्थांनी सीईओ जिल्हा परिषद आदित्य जीवने आणि जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.उल्हास गंडाळ यांचे आभार मानले आहेत. या ठिकाणी वीजजोडणी अभावी अधिकारी मुख्यालयी थांबत नाहीत, शस्त्रक्रिया, प्रसुती, आंतरविभाग आरोग्य सेवा बंद

आहेत चऱ्हाटा परीसरातील ग्रामस्थांना आरोग्य सुविधा मिळाव्यात या साठी ५ कोटी रुपये खर्चून ८ वर्षांपूर्वी आरोग्य केंद्र आणि अधिकारी, कर्मचारी निवासस्थाने या साठी सुसज्ज इमारत बांधण्यात आली होती. मात्र या साठी सुरूवातीपासूनच वीज जोडणी करण्यात आलीच नाही. त्या मुळे अधिकारी आणि कर्मचारी मुख्यालयी रहात नसल्याने रूग्णांना उपचारासाठी बीडला जावे लागते. वीज जोडणी अभावी प्रसुती, शस्त्रक्रिया, आंतररुग्ण विभाग या आरोग्य सुविधा मिळत नाहीत. प्राथमिक आरोग्य केंद्रात असुविधा असल्याने रूग्णांची हेळसांड होत होती. त्या मुळे डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या सह चऱ्हाटा येथील शेख युनुस, सुदाम तांदळे, शिवशर्मा शेलार, बप्पासाहेब पवार, मनोज तांदळे, सुभाष बांगर, संपत नागरगोजे, सुर्यकांत नागरगोजे, हरिश्चंद्र जाधव, भगिरथ उबाळे आदी ग्रामस्थांनी जलसमाधी आंदोलनात भाग घेतला होता. आता वीज जोडणी साठी निधी उपलब्ध झाला असुन लवकरच रूग्णांच्या अडचणी दुर होतील.

## बोल कविते माझ्याशी...

**बोल कविते माझ्याशी**
**तुझी ओळख आत्ताची**
**मनी होता ध्यास तुझाच**
**आस होती ग कधीची....**

**माझे शब्द माझ्या ओठी**
**आले माझ्या मुखातुनी**
**साज माझ्या कवितांचा**
**छान आला मुखातुनी....**

**सल्ला घेतला गुरूंचा**
**सर्व ऐकले मनाचे**
**विचारांनी केले काव्य**
**द्वार खुलले ज्ञानाचे....**

**लागलेय वेड मला**
**आता सखे कवितेचे**
**माझ्या रचना करते**
**भाव मम अंतरीचे.....**

**शब्द कधी रूसतात**
**शब्द कधी हसतात**
**माझे काव्य करतात**
**स्वप्नवत भासतात.....**

**कवी मन झाले आता**
**जाते विसरून दुःख**
**बोल कविते माझ्याशी**
**खूप मिळते ग सुख....**

**वसुधा नाईक,पुणे.....**
**जागतिक कविता दिनानिमित्त माझी ही कविता**

## निफाड तालुक्यातील अतिक्रमित शिवरस्ते मोकळे होणार

**दैनिक युवक आधार**
**निफाड तालुका प्रतिनिधी**
**राजेश भडांगे**



**विंचूर :-** निफाडचे तत्पर तहसिलदार विशाल नाईकवाडे यांचे मुळे निफाड तालुक्यातील गांव नकाशाप्रमाणे अतिक्रमीत व बंद झालेले शिवरस्ते, गाडी रस्ते, पाणंद, पांधण, शेतरस्ते, शिवाररस्ते, शेतावर जाण्याचे पायमार्ग आता मोकळा श्वास घेणार आहे. नाशिकचे जिल्हाधिकारी यांनी याबाबत दि.१८ डिसें.रोजी परिपत्रक काढले असून परिपत्रकात नमुद केलेनुसार गांव नकाशा प्रमाणे अतिक्रमीत व बंद झालेले शिवरस्ते, गाडी रस्ते, पाणंद/पांधण, शेतरस्ते, शिवाररस्ते, शेतावर जाण्याचे पायमार्ग मोकळे करुन जमिनीत जाणे येणेसाठी रस्ता उपलब्ध व्हावा यासाठी तालुकास्तरीय व ग्रामस्तरीय समिती गठित समिती मार्फत रस्त्यांसंबधी उद्भवणारे वाद मिटवून सर्व सहमतीने रस्ता खुला करणे व मामलेदार न्यायालय अधिनियम १९०६ चे कलम ५ व महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम १९६६ चे कलम १४३ अन्वये दाखल असलेले प्रकरणात निर्णय घेणे कामी तसेच वरील प्रयत्नातुन रस्ता खुला होत नसल्यास उपअधिक्षक भुमी अभिलेख यांचे सहाय्याने रस्ता निश्चित करुन पोलीसांचे सहाय्याने तो खुला करणेबाबत नमूद आहे. संदर्भीय परिपत्रकात नमुद केलेनुसार अंमलबजावणी करणेकामी समन्वयाने मोकळे न झालेले चितेगाव - चेहडी शिवरस्ता, चितेगाव पवार वस्ती - शेलार वस्ती रस्ता, मांजरगाव - खानगाव थडी शिव रस्ता, औरंगपुर - महाजनपुर शिव रस्ता, गाजरवाडी - सुंदरपुर सहयोगी, ब्राम्हणवाडे - सोमठाणे (जुना ग्रामीण) रस्ता, ठाकरे वस्ती - सारोळेथडी रोड लगत रस्ता, हनुमान नगर - डोंगरगाव शिव रस्ता, विचूर - गोंदेगाव शिव रस्ता, विष्णुनगर - हनुमान नगर शिवरस्ता, सोनेवाडी बु- सोनेवाडी खुर्द शिव रस्ता, कुंदेवाडी- रोळस शिव रस्ता, शिवडी - सोनेवाडी बु. - सोनेवाडी खुर्द शिवरस्ता, रानवड - कुंभारी शिवरस्ता, देवगाव- वाकद शिवरस्ता, देवगाव - रुई शिवरस्ता, साकोरे - कोकणगाव ओझर शिवरस्ता, पिंपळगाव ब. आहेरगाव शिवरस्ता, कोकणगाव - शिरसगाव शिवरस्ता, वडाळी नजिक कसबे सुकेणे शिवरस्ता, वनसगाव- खान गाव जवळ शिवरस्ता, खडकमाळेगाव - खान गाव जवळ शिवरस्ता हे मोजणी करुन पोलीस बंदोबस्तात बंद झालेले रस्ते खुले करणेबाबत निफाड तालुक्यातील अतिक्रमित रस्ते खुले होणार आहे.

# अखेर सायमाला आधार कार्ड मिळाला पोस्टमास्तर विनोद गर्जे यांची शिष्टाई फळाला...

### शासकीय पातळीवर सायमाचे अस्तित्व झाले सिध्द

**दैनिक युवक आधार**
**पाटोदा (प्रतिनिधी) -** सध्याच्या युगात एखाद्याचा आधार नंबर नसने म्हणजे त्याच्या अस्तित्वावरच प्रश्न चिन्ह निर्माण होते. असेच काहीसे गेल्या ९ वर्षांपासून उपचाराअभावी अंपगत्व आलेल्या सायमा सोबत घडले असुन पाटोदा पोस्ट ऑफिसचे पोस्ट मास्तर श्री.विनोद पोपटराव गर्जे यांची शिष्टाई फळाला आली असुन अखेर सायमाला आधार नंबर मिळाला आहे. अनावधानाने घडलेल्या अपघातात गंभीर जखमी झालेल्या सायमाला योग्य उपचार न मिळाल्याने अंपगत्व आले असुन गेल्या ९ वर्षापासून ती अंथरुणावर पडुन होती ही गंभीर बाब जेव्हा सय्यद शफावोद्दीन, पत्रकार हमीदखान पठाण, जावेद शेख यांच्या निर्दशनात आल्यानंतर त्यांनी लोकसहभागाचे आवाहन केले होते. त्यामुळे अनेक दानशूरांनी स्वतःहुन पुढे येत सढळ हाताने मदत सुरू केली असुन ती अविरतपणे सुरू असुन त्यातुनच सायमावर उपचार सुरू



> **कामं म्हणजें माझ्यासाठी पर्वणी कायमच सेवा देण्याचा प्रयत्न.**
> मी स्वतः पाटोदा तालुक्यातील महासांगवी गावचा असुन पाटोदा शहरातील तथा तालुक्यातील ग्राहकाचे काम म्हणजे माझ्यासाठी पर्वणी समजून कायमच सेवा देण्याचा प्रामाणिक प्रयत्न केलेला आहे आणि भविष्यात करणार आहे. सायमा हिला आम्ही काही तरी मदत करू शकलो हे माझे भाग्य, ईश्वर, (अल्लाह) त्यांना लवकर त्याच्या पायावर उभे करेल अशी प्रार्थना करतो.
>
> **श्री.विनोद पोपटराव गर्जे,**
> **पोस्ट मास्तर, पाटोदा.**

आहेत. मात्र शासकीय पातळीवर तिचे अस्तित्व सिध्द करण्यासाठी महत्वपूर्ण मानले जाणारे आधार कार्ड नसल्याने मोठी अडचण येत होती. तिच्या कुटुंबीयांनी अनेकदा आधार कार्ड काढण्याचा प्रयत्न केला होता मात्र अपयश येत होते. ही गंभीर घटनेकडे पाटोदा पोस्ट ऑफिसचे पोस्टमास्तर श्री.विनोद गर्जे यांना सय्यद शफाउद्दीन व पत्रकार हमीदखान पठाण, जावेद शेख यांनी लक्ष वेधले असता त्यांनी आधार कार्ड का रिजेक्ट होते याची इदभुत माहिती घेत आठ दिवस बीड, संभाजीनगर आदी वरिष्ठ अधिकाऱ्यांशी संवाद साधत सायमाच्या अस्तित्व टिकवून ठेवण्यासाठी स्वतः जबाबदारी घेत नगर पंचायत, तहसील कार्यालय तसेच शाळेतील महत्त्वाची कागदपत्रांची जुळवाजुळव करून दि.२७ फेब्रुवारीला आधार कार्ड ऑनलाइन केले होते. या दरम्यान आधार कार्ड रिजेक्ट होऊ नये या साठी वरिष्ठांशी वेळोवेळी फॉलोअप घेतला होता. मात्र १२ दिवसाचा कालावधी लोटला तरी आधार कार्ड वेटींग का आहे याचा अंदाज येत नसल्याने संभाजीनगर येथील ऑफिसचा वेळ मागुन घेत सायमालाच तिथे घेऊन जाण्याचे योजना आखली होती. मात्र दि.१५ मार्च रोजी सायमाचा आधार कार्ड ऑनलाइन झाल्यांचा मॅसेज आला सर्वांनी सुटेकेचा निश्वास सोडला खऱ्या अर्थाने पोस्टमास्तर विनोद गर्जे यांची शिष्टाई फळाला आली. याच संदर्भात दि.१९ मार्च बुधवार रोजी पोस्ट ऑफिस च्या वतीने सायमाला आधार कार्ड देण्यात आले. या वेळी सायमा व सय्यद शफाउद्दीन, पत्रकार जावेद शेख, हमीदखान पठाण, सचिन शिंदे आदीच्या वतीने पोस्टमास्तर श्री. विनोद गर्जे, श्री.काकडे साहेब, श्री तावरे साहेब, श्री.सचिनजी कांबळे, श्री.प्रसाद मोराळे, कु.अंकिता सावंत मॅडम, श्री.बेद्रे साहेब तथा इतर कार्यालयीन सहकाऱ्यांचा शाल, पुष्पहार, पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

## शनिवारी लिहा खेडी येथे जागतिक महिला दिनानिमित्त नारी शक्ती गौरव सोहळा व महिला मेळावा

### सौ.निर्मलाताई दानवे व आमदार सजंनाताई जाधव यांची प्रमुख उपस्थिती राहणार

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी :- योगेश पालोदकर**

**सिल्लोड :-** तालुक्यातील लिहाखेडी येथे जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून २२ मार्च शनिवारी सकाळी अकरा वाजता नारी शक्ती गौरव सोहळा व महीला मेळावा आयोजित करण्यात आला असल्याचे माहिती आयोजक भाजप महिला आघाडीच्या तालुका सरचिटणीस तथा ग्रामपंचायत सदस्या सौ.सुभद्राताई गजानन जाधव यांनी दिली. या कार्यक्रमांचे उद्घाटन मोरेश्वर शिक्षण प्रसारक मंडळाच्या अध्यक्षा सौ.निर्मलाताई रावसाहेब दानवे यांच्या हस्ते होणार असून कन्नड –सोयगाव मतदार संघाच्या आमदार संजना ताई जाधव यांचे मार्गदर्शन लाभणार आहे. या कार्यक्रमास जिल्हा परिषद सदस्या सौ. आशाताई पांडे, भाजप महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्षा सौ.पुष्पाताई काळे, यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे .सरपंच सौ. अनिताताई नामदेवराव साखळे यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या कार्यक्रमास अनिताताई सूरेश बनकर,मा. जि. प. सदस्या सौ. शिल्पाताई अशोकराव गरुड,मा जि.प.सदस्या अनिताताई ज्ञानेश्वर मोठे,मा.जि.प.सदस्या सौ. सरलाताई गणेश बनकर, पंचायत समिती माजी उपसभापती रुबिनाबी इद्रिस मुलतानी, उपजिल्हा रुग्णालयाच्या वैद्यकीय अधिकारी डॉ .मिनाक्षी आंधलकर, नगरसेविका रुपाली मनोज मोरेल्लू, माजी पंचायत समिती सदस्या वृषाली सुनील मिरकर, एकात्मिक महिला व बालविकास प्रकल्प अधिकारी पुष्पा वडोदे,मा.प.स.सदस्या इंदुताई रामदास हिवाळे, एकात्मिक महिला व बालविकास प्रकल्प अधिकारी वंदना कवाल, मा.प.स.सदस्या सावित्रीताई सुनील लोखंडे, पोलीस पाटील रेखा मकवाने, पोलीस हेड कॉन्स्टेबल जयश्री काळे,ज्योती परुळे, अफसाना पठाण, यांची प्रमुख उपस्थिती राहणार या कार्यक्रमास महिलांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन रुख्मनबाई अशोक साखळे,कडुबाई कृष्णा साखळे, पुष्पाताई हरीदास साखळे, सुमनबाई अंबादास सपकाळ, चित्राबाई संतोष साखळे,कविता सुनील साखळे, कविता कृष्णा फरकाडे,ताईबाई शेषराव फरकाडे, रंजना ताई विष्णु फरकाडे ,सुलाबाई भाऊलाल चव्हाण, कोकिळाबाई कृष्णा बावस्कर,राधा गणेश बावस्कर,कविता प्रभाकर बावस्कर, लक्ष्मी बाई विष्णु फरकाडे,बिजलाबाई गंगाधर साखळे,अल्काबाई देविदास साखळे यांनी केले आहे.

## बौद्धजन पंचायत समिती सभापती आनंदराज आंबेडकर यांच्या हस्ते जेष्ठ समाजसेवक सदानंद येलवे यांना समाज भूषण पुरस्कार प्रदान...

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी :-सचिन पवार**
**माणगांव रायगड**



**माणगांव :-**बौद्धजन पंचायत समितीच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रणित 98 वा चवदार तळे सत्याग्रह निमित्त माजी गटप्रतिनिधी सदानंद येलवे जेष्ठ समाजसेवक तसेच सोनबा येलवे यांचे नातू त्यांच्या 81 व्या वाढदिवसानिमित्त 20 मार्च चवदार तळे सत्याग्रह दिनी महाड क्रांतिस्तंभ या ठिकाणी आनंदराज आंबेडकर यांच्या हस्ते समाजभूषण पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी बौद्धजन पंचायत समिती या विचारमंच्यावर कार्याध्यक्ष लक्ष्मण भगत, उप सभापती विनोद मोरे, उप कार्याध्यक्ष चंद्रमणी तांबे,अतिरिक्त सरचिटणीस विठ्ठल जाधव, रवींद्र पवार, राजेश घाडगे, जीवन गौरव कमिटी चिटणीस रुपेश गमरे, रायगड जिल्हा प्रतिनिधी भूपेंद्र सवादकर, महाड तालुका अध्यक्ष अशोक जाधव, सरचिटणीस सखाराम जाधव तसेच तालुका शाखा व उपशाखा यांचे पदाधिकारी उपस्थित होते.आनंदराज आंबेडकर यांनी सदानंद येलवे यांच्या बाबत गौरव उदगार काढताना सांगितले की आंबेडकर चळवळीतील सामाजिक कार्यकर्ते सदानंद येलवे हे रायगड जिल्ह्यातील जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते असल्यामुळे त्यांना समाजभूषण पुरस्कार देण्यात येऊन सन्मान करण्यात आला यावेळी बौद्धजन पंचायत समितीचे मान्यवर पदाधिकारी व असंख्य भिम अनुयायी उपस्थित होते.

## पुरस्कारांचे बाजारीकरण : सेवाभावी कार्य विसरून पैशाने मिळणारा सन्मान!

**आसाराम विरकर, उपसंपादक – दैनिक युवक आधार, मराठवाडा आवृत्ती)**



समाजासाठी झटणाऱ्यांकडे दुर्लक्ष, तर पैसेवाल्यांना सहज पुरस्कार!
पुरस्कार देणाऱ्या संस्थांनी पारदर्शकतेची जबाबदारी घ्यावी!
व्यावसायिक हेतूने नव्हे, निःस्वार्थ सेवाकार्य करणाऱ्यांना सन्मान मिळावा!
पुरस्कार हा फक्त प्रेरणादायी व्यक्तींनाच मिळाला पाहिजे!
पुरस्कार म्हणजे कार्याचा सन्मान की पैशाने विकत घेता येणारी वस्तू?

गेल्या काही वर्षांत पुरस्कारांचे महत्त्व झपाट्याने कमी होत चालले आहे. पूर्वी पुरस्कार म्हणजे समाजातील उत्तम योगदानासाठी दिला जाणारा एक सन्मान मानला जात असे. मात्र आज, अनेक पुरस्कार हे खरेदी-विक्रीच्या बाजाराचा भाग झाले आहेत. समाजासाठी जिवाचं रान करणाऱ्या व्यक्तींना दुर्लक्षित केलं जातं, तर केवळ संपत्ती, प्रसिद्धी किंवा राजकीय दबाव असलेल्या लोकांना सहज पुरस्कार दिले जातात. यामुळे पुरस्कारांच्या प्रतिष्ठेवर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. ज्यांनी आपले संपूर्ण आयुष्य समाजाच्या भल्यासाठी समर्पित केले, त्यांच्याऐवजी काही तास, काही दिवस, किंवा काही महिन्यांच्या प्रसिद्धीसाठी काम करणाऱ्या व्यक्तींना सन्मानित केले जात आहे. हा अन्याय रोखण्यासाठी पुरस्कार देणाऱ्या संस्थांनी निवड प्रक्रियेमध्ये पारदर्शकता आणली पाहिजे आणि आर्थिक व्यवहारांना थारा दिला नाही पाहिजे. अन्यथा, हा सन्मान एक दिखाऊ प्रमाणपत्र किंवा फक्त फोटोंपुरता उरून राहील.

**आजकाल पुरस्कार कुणाला आणि का दिले जातात?**

पूर्वी पुरस्कार म्हणजे कर्तृत्व, मेहनत, समाजसेवा आणि सकारात्मक बदल घडवणाऱ्या व्यक्तींना मिळणारा सन्मान होता. पण आजकाल परिस्थिती वेगळी आहे. पुरस्कार विकत घेणारे – बऱ्याच वेळा काही लोक ठराविक रक्कम भरून पुरस्कार मिळवतात. पैसे भरले की मोठमोठ्या हॉलमध्ये 'अतिशय प्रतिष्ठेचा' पुरस्कार दिला जातो. यात त्या व्यक्तीने कोणतेही विशेष कार्य केलेले नसते. राजकीय किंवा सामाजिक प्रभावामुळे मिळणारे पुरस्कार – काही वेळा पुरस्कार फक्त ओळखीच्या लोकांना किंवा सत्ताधाऱ्यांच्या जवळच्या लोकांना दिले जातात. या पुरस्कारांचा निवड प्रक्रियेशी काहीही संबंध नसतो. फेसबुक, इंस्टाग्राम प्रसिद्धी मिळवणाऱ्या लोकांना पुरस्कार – काही लोक सोशल मीडियावर प्रसिद्ध होण्यासाठी वेगवेगळे स्टंट करतात किंवा अवघड परिस्थितीला तोंड दिल्यासारखे दाखवतात. त्यामुळे त्यांना समाजसेवेचा पुरस्कार दिला जातो. पण खऱ्या समाजसेवकांना दुर्लक्षित केले जाते.

**खऱ्या सेवाव्रतींना पुरस्कार मिळाले पाहिजेत!**

आजही प्रकाश आमटे, अण्णा हजारे, पोपटराव पवार, भास्करराव पेरे पाटील, डॉ. तात्याराव लहाने, अड. उज्वल निकम, नाना पाटेकर यांसारख्या असंख्य व्यक्ती समाजासाठी झटत आहेत. त्यांचे कार्य ही समाजासाठी एक प्रेरणा आहे.
हे लोक कोणत्याही पुरस्कारासाठी काम करत नाहीत. ते समाजसेवा, आरोग्य, शिक्षण, शेती, पर्यावरण, न्याय आणि कला क्षेत्रात निःस्वार्थपणे काम करतात. अशा व्यक्तींना पुरस्कार देणे गरजेचे आहे, कारण ते खऱ्या अर्थाने आदर्श आहेत. त्यांच्यासारखे लोक पुरस्काराने गौरवले गेले तरच त्याची किंमत आणि प्रतिष्ठा वाढेल.

**पुरस्काराच्या निवड प्रक्रियेमध्ये कोणत्या गोष्टी महत्त्वाच्या असाव्यात?**

निःस्वार्थ सेवा – पुरस्कार मिळणाऱ्या व्यक्तीने त्याच्या क्षेत्रात स्वतःची पत सिद्ध केली पाहिजे.
कार्याचा कालावधी आणि प्रभाव – त्या व्यक्तीने केलेल्या कार्याचा दीर्घकालीन प्रभाव समाजावर पडलेला असावा.
समाजासाठी केलेली बदलात्मक कृती – केवळ नावापुरते नव्हे, तर त्या व्यक्तीने ठोस सामाजिक बदल घडवले असावेत.
आर्थिक देवाणघेवाण नसावी – पुरस्कार फक्त पारदर्शक आणि योग्य निकषांवर दिला जावा, त्यात कोणताही आर्थिक व्यवहार असू नये.
गोपनीयता आणि निःपक्षपाती निवड प्रक्रिया – निवड समिती ही कोणत्याही राजकीय किंवा आर्थिक दबावाखाली नसावी.
बाजारू पुरस्कारांवर समाजानेही प्रश्न विचारायला हवा!
जर आज आपणच अशा बाजारू पुरस्कारांवर प्रश्न विचारले नाहीत, तर उद्या खऱ्या सेवाव्रतींचा अनादर होईल. त्यामुळे समाजानेही अशा बनावट पुरस्कारांना प्रोत्साहन देणे बंद करायला हवे.
जर एखादा पुरस्कार पैसे देऊन मिळत असेल, तर तो सन्मान कसा ठरू शकतो?
जे लोक फक्त प्रसिद्धीसाठी काम करतात, त्यांनी खरंच पुरस्कार मिळवायचा अधिकार आहे का?
सर्वसामान्य समाज आणि खऱ्या कार्यकर्त्यांनी असे पुरस्कार धुडकावले पाहिजेत का?
हे प्रश्न आपण विचारले पाहिजेत आणि पुरस्कारांच्या बाजारूकरणाला विरोध केला पाहिजे.
निष्कर्ष – पुरस्कार हा सन्मान राहिला पाहिजे, बाजारातील वस्तू नाही!
पुरस्कार ही एक जबाबदारी आहे. तो मिळाल्यावर त्या व्यक्तीने समाजासाठी अधिक चांगले काम करणे अपेक्षित असते. जर पुरस्कार फक्त पैशाने विकत घेतले जात असतील, तर त्यांची किंमत उरत नाही. त्यामुळे संस्थांनी पारदर्शकता ठेवली पाहिजे आणि निःस्वार्थ कार्य करणाऱ्यांनाच सन्मान दिला पाहिजे.
"पुरस्कार हा खऱ्या कर्तृत्वाचा सन्मान असला पाहिजे, तो विक्रीयोग्य नसावा!"

## यवतमाळ जिल्हा परिषदेच्या महादीप परीक्षेत चिखलवर्धा शाळेची इनाया वसिमोद्दीन पठाण जिल्ह्यात प्रथम!

### दिल्ली-आग्रा विमानवारी: जिल्हाधिकाऱ्यांकडून विद्यार्थ्यांसाठी खास भेट!

**दैनिक युवक आधार**
**घाटंजी (प्रतिनिधी - महेश पेंन्दोर)**



यवतमाळ: जिल्हा परिषद उर्दू शाळा, चिखलवर्धा येथील विद्यार्थिनी इनाया वसिमोद्दीन पठाण हिने यवतमाळ जिल्हा परिषद अंतर्गत घेण्यात आलेल्या महादीप परीक्षा 2024-25 मध्ये जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकावून शाळेचा आणि गावाचा गौरव वाढवला आहे.
इनायाने या परीक्षेत उत्कृष्ट कामगिरी करत आपल्या बुद्धिमत्तेची आणि मेहनतीची चमक दाखवली आहे. तिच्या या यशाबद्दल सर्वत्र कौतुक होत आहे. जिल्हा परिषद शिक्षण विभागानेही तिचे विशेष अभिनंदन केले आहे. इनायाच्या या यशाबद्दल शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक आणि सहकारी विद्यार्थ्यांनी आनंद व्यक्त केला आहे. इनायाने मिळवलेले यश इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी असल्याचे मत मुख्याध्यापकांनी व्यक्त केले. इनायाच्या या अतुलनीय यशानंतर, यवतमाळ जिल्हा प्रशासनाने विद्यार्थ्यांसाठी एक खास भेट जाहीर केली आहे. जिल्हाधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली, महादीप परीक्षेत यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांसाठी दिल्ली-आग्रा विमानवारी आयोजित करण्यात येत आहे. या शैक्षणिक दौऱ्यात विद्यार्थ्यांना ऐतिहासिक स्थळांना भेट देण्याची आणि विमानाने प्रवास करण्याचा अनोखा अनुभव मिळणार आहे.

**दौऱ्याची वैशिष्ट्ये:**

विमान प्रवास: विद्यार्थ्यांना दिल्लीला विमानाने नेण्यात येईल.
ऐतिहासिक स्थळांना भेट: दिल्लीतील लाल किल्ला, कुतुबमिनार, इंडिया गेट आणि आग्र्यातील ताजमहाल यांसारख्या प्रसिद्ध स्थळांना भेटी दिल्या जातील.
शैक्षणिक अनुभव: विद्यार्थ्यांना देशाच्या राजधानीतील महत्त्वाच्या ठिकाणांची माहिती मिळेल आणि त्यांचा ज्ञानवृद्धी होईल.
जिल्हाधिकाऱ्यांकडून प्रोत्साहन: विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल जिल्हाधिकाऱ्यांनी विशेष कौतुक केले असून, हा दौरा त्यांच्यासाठी प्रेरणादायी ठरेल, असे मत व्यक्त केले आहे. इनाया आणि तिच्या सर्व यशस्वी सहकारी विद्यार्थ्यांसाठी हा दौरा एक अविस्मरणीय अनुभव ठरेल, यात शंका नाही. इनायाला भविष्यातील वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा!

## मागासवर्गीय विद्यार्थ्यांना प्रलंबित शिष्यवृत्ती तातडीने अदा करा - आ. प्रशांत ठाकूर यांची अर्थसंकल्पीय अधिवेशनात मागणी

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**

रायगड जिल्ह्यातील महाविद्यालयामधील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना आर्थिक वर्षातील शिष्यवृत्ती मिळण्यासाठी विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात आमदार प्रशांत ठाकूर यांनी तारांकित प्रश्न दाखल करत मागासवर्गीय विद्यार्थ्यांना प्रलंबित शिष्यवृत्ती तातडीने अदा करण्याची मागणी केली. त्यानुसार योग्य ती कार्यवाही करण्याचे उत्तर राज्याचे सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी दिले. रायगड जिल्ह्यातील बहुतांश महाविद्यालयामधील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना सन २०२३-२०२४ व २०२४-२०२५ या आर्थिक वर्षातील शिष्यवृत्ती अद्यापपर्यंत न मिळाल्यामुळे विद्यार्थ्यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागले आहे. विविध महाविद्यालयाच्या प्राचार्यांमार्फत मागासप्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीचे अर्ज रायगड जिल्हा समाज कल्याण विभागाकडे पोहचले नसल्यामुळे सदर विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित राहिले आहेत, त्यामुळे या प्रकरणी शासनाने चौकशी करुन मागासवर्गीय विद्यार्थ्यांना प्रलंबित शिष्यवृत्ती तातडीने अदा करण्याबाबत तसेच यास जबाबदार असणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, असा तारांकित प्रश्न दाखल करून या विषयावर शासनाचे लक्ष वेधले. या प्रश्नावर दिलेल्या लेखी उत्तरातून मंत्री संजय शिरसाट यांनी सांगितले कि, रायगड जिल्ह्यातील बहुतांश महाविद्यालयामधील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना सन २०२३-२०२४ आणि सन २०२४-२०२५ या आर्थिक वर्षातील शिष्यवृत्ती न मिळाल्याने विद्यार्थ्यांची आर्थिक अडचण निर्माण झाल्याची तसेच काही महाविद्यालयाच्या प्राचार्यांमार्फत मागासप्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीचे अर्ज रायगड जिल्हा समाज कल्याण विभागाकडे पोहच न झाल्याने सदर विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित राहिल्याची बाब अंशतः खरी आहे. सन २०२३-२४ मधील पात्र ३८६० विद्यार्थ्यांपैकी ३६८६ विद्यार्थ्यांना व सन २०२४-२५ मध्ये पात्र ३४४८ पैकी २६३९ विद्यार्थ्यांना राज्य शासनामार्फत राज्यहिश्याचा ४० टक्के निधी वितरित करण्यात आला आहे. उर्वरित बहुतांशी अर्ज महाविद्यालयाच्या स्तरावर प्रलंबित असून सदर अर्ज तातडीने निकाली काढण्याच्या सूचना महाविद्यालयांना देण्यात आल्या आहेत. तसेच केंद्र शासनाकडून थेट विद्यार्थ्यांना देय होणारा ६० टक्के हिस्सा देखील केंद्र शासनामार्फत विद्यार्थ्यांच्या बँक खात्यामध्ये परस्पर अदा करण्यात येत असून विद्यार्थ्यांना व महाविद्यालयांना उद्भवणाऱ्या अडचणींबाबत राज्य शासनामार्फत वेळोवेळी उपाययोजना करण्यात येत आहे, असेही नामदार संजय शिरसाट यांनी उत्तरात नमूद केले.

## लालबहादूर शास्त्री विद्यालयाचे आगारप्रमुखांना निवेदन..

### सोयंजना,येणोरा बस सुरु करण्याची मागणी

**दैनिक युवक आधार**
**परतूर-जालना (अशोक ढोके)**



दि. 21 - मागील काही काळापासून बंद असलेली सोयंजना, येणोरा ही बस पुन्हा पूर्ववत सुरु करावी अशी मागणी शहरातील शिवाजीनगर भागातील लालबहादूर शास्त्री विद्यालयाच्या वतीने आगार प्रमुखांकडे एका निवेदनांद्वारे करण्यात आली आहे.
यासंदर्भात दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की,शहरातील शिवाजीनगर भागातील लालबहादूर शास्त्री विद्यालयात सोयंजना, येणोरा येथील विद्यार्थी मोठ्या संख्येने शिकण्यासाठी येतात. यामध्ये मुलींची संख्या मोठी आहे.परतूर-येणोरा ही सोयंजना, हातडी मार्गे धावणारी बस मागील काही काळापासून बंद आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. बस बंद असल्याने विद्यार्थ्यांना शाळेपर्यंत पोहोचण्यासाठी अडचण येत आहे.बस बंद असल्याने विद्यार्थी शाळेत येण्यासाठी खासगी वाहनाचा सहारा घेत आहेत. परंतु खासगी वाहनातून प्रवास करणे सर्वसामान्य विद्यार्थी व त्यांच्या पालकांना आर्थिकदृष्ट्या परवडणारे नसते.ही बाब लक्षात घेता राज्य परिवहन मंडळाने सदरील बस सुरु करण्याची गरज असल्याचे या निवेदनात म्हटले आहे.यावेळी पर्यवेक्षक राजकुमार राऊत, त्र्यंबक घुगे, बालाजी ढोबळे, मोरे, बिडवे यांची उपस्थिती होती.
आमच्या लालबहादूर शास्त्री विद्यालयात सोयंजना, येणोरा येथील विद्यार्थी मोठ्या संख्येने शिकण्यासाठी येतात. मात्र मागील काही काळापासून सोयंजना बस बंद करण्यात आली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये, विद्यार्थ्यांना दररोज शाळेत येता यावे यासाठी बस सुरु करण्याची मागणी केली आहे.- एल. के. बिरादार, मुख्याध्यापक.

## महाबोधी महाविहार बौद्धांच्या ताब्यात घेण्यासाठी २९ मार्च पासुन ३ दिवस बुध्दगयेत ठाण मांडणार - केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले

**दैनिक युवक आधार**
**पनवेल- (आनंद पवार)**

बुद्धगया येथील महाबोधी महाविहार मुक्तीसाठी रिपब्लिकन पक्ष देशभर होणाऱ्या आंदोलनात सहभागी झालेला असुन राज्यातही रिपब्लिकन कार्यकर्त्यांचे महाबोधी महाविहारासाठी आंदोलनात सहभागी झाले आहे.महाबोधी महाविहार बौद्धांच्या ताब्यात आलेच पाहिजे.त्यासाठी बिहार मधील महाबोधी टेंपल१९४९चा एक ॲक्ट रद्द झाला पाहिजे.महाबोधी महाविहाराचे ४ट्रस्टी हिंदु आणि ४ ट्रस्टी बौध्द हा नियम रद्द करुन सर्व ट्रस्टी बौध्द असावेत असा कायदा केला पाहिजे या मागणीसाठी आपण येत्या २९ मार्च पासुन तीन दिवस बुध्दगयेत ठाण मांडणार आहोत.बुध्दगयेत आंदोलन करणाऱ्या बौध्द धम्मगुरूंची आपण भेट घेणार आहोत तसेच बिहारचे मुख्यमंत्री नितीशकुमार,आणि बिहारचे राज्यपाल मा.मो.आरिफ खान यांची आपण भेट घेणार असल्याचे केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी सांगितले.महाबोधी महाविहार पूर्णपणे बौद्धांच्या ताब्यात यावे यासाठीच्या आंदोलनात मोठ्या संख्येने व पुर्ण ताकदीने उतरावे असे आवाहन रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना.रामदास आठवले यांनी केले आहे. चवदार तळे सत्याग्रहाच्या ९८व्या वर्धापनदिनी रायगड जिल्हा रिपब्लिकन पक्षाच्या वतीने आयोजित महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना विनम्र अभिवादन करणाऱ्या जाहिर सभेत ना.रामदास आठवले बोलत होते.यावेळी रिपब्लिकन पक्षाचे रायगड जिल्हा अध्यक्ष नरेंद्र गायकवाड,कोकण प्रदेश अध्यक्ष प्रकाश मोरे,मुंबई अध्यक्ष सिद्धार्थ कासारे,पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष अशोक गायकवाड,सुर्यकांत वाघमारे, युवक आघाडी प्रदेश अध्यक्ष पप्पू कागदे,परशुराम वाडेकर,विवेक पवार; घनश्याम चिरणकर,आदेश मर्चंडे,अमित तांबे,सुशांत सकपाळ,लोकप्रिय गायक आनंद शिंदे,मिलिंद शिंदे,राहुल शिंदे,शाहीर राजा कांबळे,राहुल डाळींबकर,मोहन खांबे,लक्ष्मण जाधव,सुनिल बंसी मोरे,श्रीकांत कदम आदी मान्यवर उपस्थित होते. महाबोधी टेम्पल ॲक्ट १९४९चा रद्द करुन बुध्दगयेतील महाबोधी महाविहाराचा ताबा बौध्दांना देण्यासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी बिहारचे मुख्यमंत्री नितीशकुमार त्यांना निर्देश देऊ शकतात तसा प्रयत्न आपण करणार असल्याचे आठवले यांनी स्पष्ट केले.त्याच बरोबर मी स्वतःबिहारचे मुख्यमंत्री नितिशकुमार यांना आणि बिहारचे राज्यपाल मो.आरीफ खान यांना भेटून बुध्दगयेतील महाबोधी महाविहार बौद्धांच्या ताब्यात देण्याची मागणी करणार आहे. तसेच बुध्दगयेत तीन दिवस थांबून बुध्द भिक्खूंच्या आंदोलनाला पाठिंबा देणार असल्याचेही त्यांनी यावेळी जाहीर केले. महाबोधी महाविहार बौद्धांच्या ताब्यात घेण्यासाठी रिपब्लिकन पक्ष महाराष्ट्रासह बिहार आणि संपूर्ण देशभर आंदोलन सुरु ठेवणार असल्याची भूमिका आठवले यांनी स्पष्ट केली असुन महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलनात रिपब्लिकन पक्ष ताकदीने उतरला आहे.सर्व आंबेडकरी जनतेने एकजुटीने महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलनाला एकजुटीने बळ द्यावे असे आवाहन ना.रामदास आठवले यांनी केले.सभेपूर्वी ना.रामदास आठवले यांनी महाड येथील क्रांतीस्तंभाला अभिवादन केले.यावेळी हजारोंच्या संख्येने आंबेडकर अनुयायी उपस्थित होते.

## गजानन गेडाम जिल्हास्तरीय फ्लोरेन्स नाईटिंगेल पुरस्काराने सन्मानित.

### जिल्हा परिषद गडचिरोली चे मुख्य कार्यकारी आधिकारी श्री. सुहास गाडे साहेब यांच्या हस्ते दिला पुरस्कार.

दैनिक युवक आधार
स्नेहा उत्तम मडावी
गडचिरोली जिल्हा

जगातील पहिली अधिपरिचारिका, आद्य परिचर्येच्या जनक फ्लोरेन्स नाईटिंगेल यांच्या जन्मदिना निमित्य परिचर्या क्षेत्रात उल्लेखनीय सुश्रुषा सेवा करणाऱ्या परिचारिकांना फ्लोरेन्स नाइटिंगले पुरस्काराने सन्मानित केल्या जाते. असेच गडचिरोली जिल्ह्यात परिचर्या क्षेत्रात २०१३ पासून उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल राष्ट्रीय आरोग्य अभियान, आरोग्य विभाग, ज़िल्हा परिषद गडचिरोली तर्फे जिल्हास्तरीय फ्लोरेन्स नाईटिंगेल पुरस्कार सोहळ्यात जिल्हा सामान्य रुग्णालय गडचिरोली येथे अधिपरिचारिका पुरुष या पदावर कार्यरत श्री गजानन भिकाजी गेडाम यांना प्रशस्तीपत्र व सन्मान चिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा परिषद गडचिरोली चे मुख्य कार्यकारी अधिकारी सुहास गाडे होते तर मंचावर जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ प्रताप शिंदे, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ अमित साळवे, जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ सचिन हेमके, जिल्हा हिवताप अधिकारी डॉ पंकज हेमके, महिला व बाल रुग्णालय गडचिरोली चे वैद्यकीय अधीक्षक डॉ पेंदाम, जिल्हा माता व बाल संगोपन अधिकारी डॉ हुलके, सहाय्यक अधिसेविका आशा बावणे आदी उपस्थित होते. सर्वत्र गजानन गेडाम यांचे कौतुक होत आहे.



## शेवटचा अशरा महत्वपूर्ण

रमजान महिन्यातील शेवटचा तिसरा खंड काल सायंकाळ पासूनच सुरू झाला आहे. या कालखंडात शब ए कद्र ही महत्त्वपूर्ण रात्र येणार आहे.या रात्रीत जास्तीत जास्त प्रार्थना करून आपल्या खात्यात पुण्यसंचय करण्याची नामी संधी प्रत्येकाला उपलब्ध झालेली आहे. रमजान महिना पूर्णत्वास जाताना ज्यांनी पूर्ण महिन्याचे योग्य प्रकारे पालन केले, अशांना ईदचा खरा आनंद प्राप्त होतो. ईदची तयारी देखील आता सुरू झाली आहे. आपले नातेवाईक, सभोवताली राहणारे आपले शेजारी,परिचित या सर्वांची विचारपूस करून ईदचा आनंद प्रत्येकाला कसा प्राप्त होईल याकरिता आपले योगदान देण्यासाठी प्रत्येकजण आतुर झालेला आहे. रमजान महिना ही उम्मते मोहम्मदीला मिळालेली एक अनमोल अशी भेट आहे. या महिन्याचे जास्तीत जास्त योग्य प्रकारे पालन करून आपल्या जीवनामध्ये एक आदर्श जीवन प्रणाली आत्मसात करण्याची संधी या निमित्ताने प्राप्त झालेली आहे.तिचा सदुपयोग करून घेण्याची आवश्यकता आहे. रोजच्या जीवनामध्ये वेगवेगळ्या कारणास्तव समाजातील अनेक घटकांचा एकमेकांशी संबंध येतो.खेड्यात किंवा शहरात वेगवेगळ्या व्यवसायाच्या निमित्ताने विविध धर्मीय नागरिक वेगवेगळे उद्योग व्यवसाय करीत असतात. गरजेनुसार प्रत्येकाचा एकमेकाशी संबंध येतो. ज्यावेळी माणसाला गरज असते त्यावेळी तो समोरच्या व्यक्तीची जात,धर्म,पंथ पाहत नाही तर आपली गरज कशी पूर्ण होईल याकडे त्याचा जास्त ओढा असतो. अनेक लोक




जाती धर्माच्या पलीकडे जाऊन आपली मैत्री जपतात. वर्षानुवर्षांचे हे ऋणानुबंध आज खूपच दृढ झालेले आहेत. अचानकपणे ढगाळ वातावरण निर्माण होऊन काही काळासाठी आकाश झाकोळले जाते तसे आपल्या या समाजात एकात्मतेला तडा देण्यासाठी काही घटक अधून मधून डोके वर काढतात पण आपल्या एकोप्यामुळे अशा लोकांचे मनसुबे धुळीस मिळतात. गेली तीन आठवडे प्रसिद्ध झालेल्या या रमजान लेखमालेबद्दल अनेक वाचकांनी प्रत्यक्ष फोन करून आपल्या प्रतिक्रिया दिल्या व धार्मिक व सामाजिक सलोख्यासाठी दैनिक लोक आवाज च्या आज पर्यंतच्या योगदानाचा गौरवपूर्ण असा उल्लेख केला आहे.इस्लामी संस्कृती,इस्लाम धर्माबद्दलची माहिती, रीतीरिवाज याबद्दल खूप काही माहिती या माध्यमातून प्राप्त झाल्याच्या प्रतिक्रिया अनेकांनी व्यक्त केल्या. गेली सत्तावीस वर्ष सामाजिक जबाबदारीच्या जाणिवेतून ही लेखमाला चालवली.वाचकांकडे गेल्या अनेक वर्षाची या लेखमालेची कात्रणे उपलब्ध आहेत.हे या लेखमालेच्या लोकप्रियतेचे प्रतीक आहे.आज पर्यंत आपण सर्व वाचकांनी दिलेल्या भरभरून प्रतिसादाबद्दल सर्वांना मनापासून धन्यवाद. आपल्या या बहुभाषिक आणि बहुधार्मिक राज्यामध्ये धार्मिक सलोखा राखण्याचे कार्य या निमित्ताने दैनिक जनतेचा आवाज केले आहे.त्याबद्दल या परिवाराला द्यावे तेवढे धन्यवाद थोडे आहेत.(क्रमशः)

**सलीमखान पठाण**
**9226408082.**

## जागतिक जलदिन - १० वर्षांच्या निर्माल्य संकलनाने सिल्लोडच्या विसर्जन तलावात जैवविविधता बहरली, स्थलांतरीत पक्षी ही अधिवासास

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधीः- योगेश पालोदकर**

**सिल्लोड -** गत अनेक वर्षांपासून सिल्लोड शहरालगत असलेल्या जळगाव रोडवरील तलावात श्री गणपती, घटस्थापना तील देवी मूर्ती व त्यासोबत निर्माल्या विसर्जन केले जायचे. त्यातून मोठ्या प्रमाणात कुजणारे पूजेचे साहित्य,प्लास्टर ऑफ पॅरिस, प्लॅस्टिक,काच, धातूच्या वस्तू, रंग, रासायनिक गुलाल, धार्मिक कपडे आदी मोठया प्रमाणात जमा व्हायचे. यातुन मोठया प्रमाणात जल प्रदूषण व्हायचे व त्याचा विपरीत परिणाम म्हणून त्या पाण्याची गुणवत्ता खालवून, प्रदूषित झाल्याने जलचर, मासे, तेथील पान वनस्पती,पानपक्षी यांच्या संख्येत मोठी घट होत गेली. स्वदेशी उपयुक्त वनस्पती नष्ट झाल्याने चारही बाजूने हानिकारक आयपोमिया (बेशरम ) बेसूसुमार वाढली. 'अभिनव प्रतिष्ठान' या सामाजिक व पर्यावरण संवर्धन करणाऱ्या संस्थेने जिल्ह्यात सर्वप्रथम १० वर्षांपूर्वी अध्यक्ष किरण पवार, डॉ.संतोष पाटील व संस्थेचे १०० हून अधिक सदस्य यांनी गणेशोत्सवात निर्माल्य संकलन करण्यास सुरुवात केली. शहरातील हिंदू बांधवानी ही यास शंभर टक्के प्रतिसाद दिला. दरवर्षी ३ टन निर्माल्य जमा होते. आजवर ३० टन निर्माल्य या पाण्यात जाण्या पासुन रोखले गेले व मोठे जळप्रदूषण टाळले गेले.किरण पवार यांच्या सातत्याच्या मागणीने यात भरीस भर म्हणून सिल्लोडच्या स्थानिक न. प. प्रशासनाने ३ वर्षांपासून या ठिकाणी श्री मूर्ती विसर्जन करण्यास बंदी करून "प्लास्टर ऑफ पॅरिस" पासुन ही हे पाणी सुरक्षित राहिल्याने जैविविधतेस मोकळा श्वास येथे घेता येऊ लागला.३ वर्षात पी. ओ .पी .ची एकही मूर्ती या जलाशयात विसर्जित झाली नाही. सुमारे ६ टन पी ओ पी या ३ वर्षात पाण्यात गेले असते.अनेक देशी पान पक्षी, स्थलांतरीत पक्षी, पान वनस्पती, स्थानिक मासे प्रजाती येथे, जलचर यांना निकोप अधिवास मिळत असल्याचे अभिनवचे उपाध्यक्ष,पर्यावरण संवर्धक डॉ. संतोष पाटील यांना वर्षभराच्या सर्वेक्षनातून आढळले आहे.



यांना मिळाला निकोप अधिवास- पक्षी- दुर्मिळ पर्पल हेरॉन, गाय बगळा, कांडेसर , रेड आयबीस, तुतवार, शेकाट्या आदी सह १९ प्रकारचे पक्षी. मासे- गेर, पाबदा मरोळ, डोख, वाम इ .१३ प्रकारचे मासे व असंख्य जलचर. धामण, दिवट, तस्कर, नाग, घोनस आदी ८ प्रजातीचे साप.पान वनस्पती - नामशेष व्हायला आलेल्या पानकणीस च्या ३ प्रजाती राज्यात असून त्या पैकी २ जाती( टायफा लॅटीफोलिया व ( टायफा अगसटीफोलीया) या तलावाकाठी ४ ठिकाणी चांगल्या वाढीस लागल्या आहेत. मात्र तलावाच्या उत्तरेस बेशरम ही विदेशी हानिकारक जल वनस्पती व जलपर्णी अजून ही मोठया प्रमाणात आहे.

## थेपडे विद्यालयात विविध स्पर्धा "बक्षीस वितरण समारंभ" उत्साहात साजरा

**दैनिक युवक आधार**
**जळगाव जिल्हा प्रतिनिधी**
**समाधान पाटील**

जळगाव तालुक्यातील म्हसावद येथील थेपडे म्हसावद माध्यमिक विद्यालयात वार्षिक बक्षीस वितरण सोहळा आज संपन्न झाला. या सोहळ्याच्या प्रसंगी विद्यालयाचे मुख्याध्यापक पी.डी.चौधरी सर हे अध्यक्षस्थानी विराजमान होते .तसेच विचार मंचावर शाळेचे उपमुख्याध्यापक जी.डी.बच्छाव सर पर्यवेक्षक शके. पी.पाटील सर तसेच ज्येष्ठ शिक्षिका नेवे मॅडम, जेष्ठ शिक्षक नेतकर सर, एस.सी. बाविस्कर सर ,ज्युनिअर कॉलेजचे विभाग प्रमुख चिंचोरे सर व शिक्षक प्रतिनिधी सचिन चव्हाण उपस्थित होते. शैक्षणिक वर्ष 2024-25 मध्ये शालेय स्तरावर विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणांसोबत त्यामध्ये असणारे सुप्त गुण यांना चालना मिळावी म्हणून फनी गेम्स, विविध स्पर्धा ज्यामध्ये क्रिकेट ,कबड्डी तसेच वर्षभरामध्ये बौद्धिक ज्ञानावर आधारित विविध स्पर्धा परीक्षांचे आयोजन करण्यात आले. स्पर्धेमध्ये व स्पर्धा परीक्षेमध्ये विजयी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व पारितोषिक देऊन त्यांचा गुणगौरव करण्यात आला. विद्यालयाचे मुख्याध्यापक यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून विद्यार्थ्यांनी अभ्यासासोबत शारीरिक खेळाला महत्त्व दिले पाहिजे .ज्यामुळे आपली शारीरिक वाढ ही व्यवस्थित होते. खेळ प्रकारामध्ये आपण आपलं स्वतःचं करियर घडवू शकतो, याबद्दल त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. विविध खेळाडूंचे दाखले देत विद्यार्थ्यांनी स्वतःचा सर्वांगसुंदर व्यक्तिमत्व विकास कसा करावा यावर आपले विचार व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन एस. जे. पवार सर यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी सर्व शिक्षकवृंद व शिक्षकेतर कर्मचारी बंधू-भगिनी यांनी सहकार्य केले.




## शिव व्याख्याते धिरेंद्र ठाकूर यांच्या व्याख्यानातून प्रेरित दुंदराई गावकऱ्यांनी घेतले श्रीमान रायगडाचे दर्शन.

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी रणिता ठाकूर**
**उरण रायगड.**

ऊरण तालुक्यातील पाणदिवे गावातील सुप्रसिद्ध शिवव्याख्याते सह्याद्री रत्न धिरेंद्र ठाकूर अभ्यासपूर्ण शिव चिंतनातून नुकत्याच झालेल्या १९ फेब्रुवारीच्या २०२५ च्या शिवजयंती निमित्ताने एकाच दिवशी ५ ठिकाणी व्याख्यानमालेतून शिव विचारांचा जागर घालण्यात आला.गतवर्षी १९फेब्रुवारी २०२४ ला एकाच दिवशी चार व्याख्यान देण्याचं उल्लेखनीय काम त्यांच्या हातून झालं होतं.अगदी यावर्षीही त्यांनी एकाच दिवशी गाव आणि शहरात ५ ठिकाणी व्याख्यान देऊन शिवचरित्राचा जागर प्रभावीपणे मांडला.१९फेब्रुवारी २०२५ च्या शिवजयंती निमित्त प्रथम रायगड जिल्हा परिषद शाळा करवले, नंतर पेण -दादर तसेच पनवेल मधील सर्वात मोठी रहिवासी कॉलनी बालाजी सिंफोनी येथे, त्याच्यानंतर दुंदराई गावात व्याख्यान झाल्यानंतर करंजाडे पनवेल येथे निवेदनात्मक व्याख्यान देऊन छत्रपती शिवाजी महाराजांच्या कर्तुत्वाचा, नेतृत्वाचा गौरवशाली इतिहासाचे दाखले देऊन आपल्या अनोख्या शैलीतून त्यांनी प्रभावीपणे शिव व्याख्यान केले छत्रपती शिवाजी महाराजांनी व त्यांच्या प्रेरणेतून निर्माण झालेले स्वराज्य ,तसेच इतिहासातील दुसरी पावनखिंड, छत्रपतींचा साम्राज्य नव्हे स्वराज्य ,कोकण किनारपट्ट्यातील स्वराज्यासाठी खर्चिक पडलेले मावळे अशा विविध विषयांवर अभ्यासपूर्ण व्याख्यान दिले.यामध्ये दुंदराई गावात झालेल्या व्याख्यानात उपस्थित शिवप्रेमींना 'एकदा तरी रायगड किल्ला पहावा' असे अवाहन केल्यानंतर व्याख्यानातून प्रेरणा घेऊन गावातील लहान मुलं, विद्यार्थी, तरुण ,प्रौढ, शिवप्रेमी धरतीवरील स्वर्ग म्हणजे रायगड किल्ला भेट देण्यासाठी सज्ज झाले. विशेष म्हणजे दुंदराई गावातील रायगड जिल्हा परिषदेचे आदर्श ,प्रामाणिक आणि गुणवंत शिक्षक संतोष पाटील यांनी रायगडाला भेट देण्यासाठी पुढाकार घेऊन त्याचं नियोजन व संयोजन केले. सन्माननीय ग्रामस्थांनी ,दानशूर व्यक्ती, समाजसेवकांनी या स्तुत्य उपक्रमासाठी सर्वतोपरी मदत केली व त्यात सहभागी झाले होते. एकंदरीत व्याख्यानातून प्रेरणा घेऊन सर्व गावकऱ्यांनी श्रीमान रायगडाचे दर्शन घेतले आणि छत्रपती शिवाजी महाराजांना मानाचा मुजरा केला.





## डॉ. दयानंद वासुदेव राणे यांना डॉक्टर ऑफ फिलोसोफी (पी.एच.डी.) उपाधी प्रदान

**दैनिक युवक आधार**
**मुंबई(पंकजकुमार पाटील):**

वॉशिंग्टन डीसी ( यु.एस ) येथील नामांकित cederbrook university कडून वैदिक वास्तुशास्त्र या विषयातील विशेष संशोधन कार्यासाठी डॉ. दयानंद वासुदेव राणे ( डॉ. आनंदसर ) यांना डॉक्टर ऑफ फिलोसोफी (पी.एच.डी. ) उपाधी नुकतीच प्रदान करण्यात आली. डॉ. दयानंद व्ही. राणे गेली २३ वर्षांपासून वैदिक वास्तुशास्त्र व वैदिक साहित्य क्षेत्र, संशोधन व प्रशिक्षण यामध्ये कार्यरत आहेत. वैद्यक विषयातील पदवीधर असलेले प्रा.डॉ. दयानंद राणे (आनंदसर) "भारतीय वैदिक विज्ञान संशोधन संशोधन संस्था मुंबई®" या संशोधन प्रशिक्षण संस्थेचे संस्थापक, अध्यक्ष असून वैदिक वास्तुशास्त्र व डाउझिंग विषयात हजारो विद्यार्थ्यांना ते मार्गदर्शन करत आहेत. त्यांनी सूक्ष्म स्पंदन विज्ञान व वनस्पती विज्ञान या विषयातील "गंधपरमानू एन इफेक्ट ऑफ ह्युमन बॉडी अँड वास्तु" हा संशोधन प्रबंध लिहिला आहे व त्यासाठी त्यांना सदर पी.एच.डी.मिळाली आहे.




## न्यू इंग्लिश स्कूल शिरोली बुद्रुक विद्यालयात चिमण्यांसाठी घरटी व पाणपोई निर्मिती

**जुन्नर प्रतिनिधी**



पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या न्यू इंग्लिश स्कूल शिरोली बुद्रुक विद्यालयामध्ये जागतिक चिमणी दिन मोठ्या उत्साहामध्ये साजरा करण्यात आला. विद्यालयातील परीक्षा प्रमुख श्री निधन तुकाराम यांनी कार्यक्रमाची प्रस्तावना केली.राष्ट्रीय हरित सेना व वनराई अंतर्गत इको क्लबचे प्रमुख श्री देवकुळे संतोष यांनी चिमण्यांच्या निसर्गामध्ये अन्नसाखळी मध्ये असणारे महत्त्व व चिमण्यांचं प्रमाण कमी होण्याची कारणे याबाबत माहिती दिली. विद्यालयाचे सांस्कृतिक विभाग प्रमुख श्री अय्यर रामचंद्र यांनी प्राचीन युगापासून ते आजतागायत चिमणीचं निसर्गात असणारे स्थान, चिमण्यांची बडबड गीते,चिऊकाऊ च्या मनोरंजक गोष्टी मुलांना सांगीतल्या. विद्यार्थ्यांनी परिसरामध्ये उपलब्ध असलेल्या नैसर्गिक साधनांमध्ये कागदी पुठ्ठा,बांबूच्या काड्या,नारळाची करवंटी,सुतळी,काथ्या, खराब झालेल्या प्लास्टिकच्या बॉटल्स, लोखंडी तार यांच्या साह्याने आकर्षक अशी चिमण्यांसाठी घरटी व पाणपोई विद्यार्थ्यांनी बनविले. या उपक्रमात साई ढोमसे, रुद्र ढोमसे, हर्षवर्धन विधाटे,समर्थ बोचरे,विराज विधाटे, मयंक विधाटे आयुष नलावडे,साई बोराडे, स्वराली जाधव,आर्या ढोमसे, स्वरा शिंदे, सिद्धी बोराडे,मलिशा शिंदे ,संस्कृती ढोमसे, समृद्धी थोरवे या विद्यार्थ्यांनी या उपक्रमात सहभाग घेतला. साई ढोमसे व समर्थ बोचरे या विद्यार्थ्यांनी यांनी घरटी व पाणपोई तयार करण्याचे प्रात्यक्षिक मुलांसमोर करून दाखवले. मुलांपैकी स्वराली जाधव या विद्यार्थिनीने चिमणी दिनाचे महत्व सांगीतले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन विद्यालयातील आर एस पी विभाग प्रमुख श्री सुनील विरणक यांनी केले. विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री प्रसाद हांडे व पर्यवेक्षक सौ अनघा घोडके यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम संपन्न झाला

## पाचोरा शहरात दुःखद घटना ! 16 वर्षांनंतर बाप झाल्याचे स्वप्न पूर्ण झाले पण मोठा अनर्थ झाला पण जुळ्या मुलांचे मातृछत्र हरपलं.... "माहेरची साडी"चित्रपटाची पाचो-या वासियांना झाली आठवण.

**लोहारा.(जळगांव खान्देश )**





**लोहारा -:-**पाचोरा येथील बाहेरपुरा भागातील माहेरवाशीण ज्योती ज्ञानेश्वर चौधरी (वय ३७) हिला लग्नाच्या १६ वर्षांनंतर बुधवारी (१९ मार्च२०२५ ) रोजी दुपारी चारच्या सुमारास शहरातील भडगाव रस्त्यावरील सावनेरकर हॉस्पिटलमध्ये मुलगी,व मुलगा अशी दोन बाळं जन्माला आली. दोन्ही बाळं जन्माला आल्यानंतर तीन तासात बाळाला जन्म देणारी आई ज्योती चौधरी यांचे सायंकाळी सातच्या सुमारास हृदयविकाराचा झटका आल्याने निधन झाले. या घटनेने महिलेचा पती, आई, वडील, भाऊ यांनी हृदयहेलावणार आक्रोश केला. विवाह होऊन १६ वर्षे झाली, तरी बाळ जन्माला येत नव्हते. म्हणून ज्योतीच्या पतीने व आई-वडिलांनी ट्रिटमेंट केली. गेल्या नऊ महिन्यांपासून ज्योतीला तळहाताच्या फोडाप्रमाणे जपले. बुधवारी (१९ मार्च) ज्योतीला प्रसवकळा सुरू झाल्या आणि मुलगा व मुलगी अशा दोन बाळांना तिने जन्म दिला. पती-पत्नी व आई-वडिलांना आणि ज्योतीच्या दोन्ही भावांना आनंद झाला. तीन तासांनंतर त्या आनंदावर विरजण पडले. त्यांच्यावर दुःखाचा डोंगरच कोसळला. बाळाच्या आईला हृदयविकाराचा झटका आला. त्यात तिचा मृत्यू झाला. घटनेमुळे ज्योतीचा माहेर व सासरचा परिवार दुःखसागरात बुडाला. I घटने मुळे शहरात प्रचंड हळहळ व्यक्त होत आहे.. ही घटना म्हणजे मराठी चित्रपट" माहेरची साडी" या चित्रपटात अभिनेत्री अलका कुबल ही जन्माला येते आणि तिच्या आईचे निधन होते. त्यास प्रकारे ही दुर्दैवी घटना पाचोरा शहरात घडली आहे. काल गुरुवारी (२० मार्च) सकाळी दहाला ज्योती चौधरीवर शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.

## मिरी येथील व्यवसायिकांची गाळे उपलब्ध करून देण्याची ग्रामपंचायत कडे मागणी

**मिरी :** पाथर्डी तालुक्यातील मिरी गावातील छोट्या व्यावसायिकांनी गावात व्यापारी गाळे उपलब्ध करून देण्याची लेखी मागणी ग्रामपंचायतीकडे केली आहे. मिरी येथील रस्त्यालगत असलेले अतिक्रमण हटविण्यात आल्याने रस्त्याच्या बाजूला व्यवसाय करत असलेल्या अनेक छोट्या व्यवसायिकांच्या दुकानांवर अतिक्रमण पथकाकडून कारवाई झाल्याने अनेकांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाला आहे. व्यावसायिकांनी दिलेल्या अर्जात सांगितल्या प्रमाणे अतिक्रमण काढल्याने त्यांना व्यवसाय करण्यासाठी योग्य ठिकाण उपलब्ध नसल्याने व्यावसाय ठप्प झाले आहेत त्यामुळे कुटुंबाच्या उदरनिर्वाहाचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे या संदर्भात योग्य मार्ग काढून उपाययोजना करण्यासाठी व सदर व्यावसायिकांचे पुनर्वसन करण्यासाठी ग्रामपंचायतीने लवकरात लवकर ग्रामसभा घ्यावी. व तात्पुरत्या स्वरूपात सर्व व्यवसायिकांसाठी जागा उपलब्ध करून द्यावी अशी मागणी लेखी अर्जाद्वारे करण्यात आली आहे. या मागणीसाठी मिरी गावातील सर्व व्यवसायिकांनी एकत्र येऊन ग्रामपंचायतकडे अर्ज सादर केला आहे. या अर्जावर विविध व्यवसायिकांच्या स्वाक्षऱ्या आहेत. त्यामुळे यासंदर्भात ग्रामपंचायत सकारात्मक विचार करून लवकरच सर्वसमावेशक भूमिका घेईल अशी अपेक्षा व्यवसायिकांनी व्यक्त केली आहे.

## क्षमतावृद्धी कार्यशाळेत शिक्षकांच्या सक्षमीकरणावर विशेष भर - डॉ.नामदेव शेंडकर

**प्रतिनिधी**

नवीन शैक्षणिक धोरण -२०२०च्या अनुषंगाने जागतिक स्तरावर होणाऱ्या आमुलाग्र बदलांचा विचार करता शिक्षण क्षेत्रातील नवनवीन आव्हानांना सामोरे जाण्यासाठी विद्यार्थी आणि शिक्षक यांना सक्षम करणे आवश्यक आहे. शिक्षणाची धोरणे,अध्ययन-अध्यापन,मूल्यमापन यामध्ये तंत्रज्ञानाचा वापर अपेक्षित आहे त्यादृष्टीने ज्ञान आणि कौशल्य तसेच क्षमता विकसन याबाबत शिक्षकांना अधिकाधिक प्रशिक्षित करणे गरजेचे असल्याचे मत जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था पुणेचे प्राचार्य डॉ.नामदेव शेंडकर यांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० शिक्षक क्षमता वृद्धी प्रशिक्षणाच्या शिरूर तालुक्यातील प्रशिक्षणवर्ग भेटीच्या निमित्ताने व्यक्त केले शिरूरचे गटशिक्षणाधिकारी बाळकृष्ण कळमकर यांच्या नियोजनाने सुरू असलेल्या या प्रशिक्षणाच्या पाचव्या टप्प्यात विविध विद्यालयाचे प्राचार्य, मुख्याध्यापक,केंद्रप्रमुख,विषयतज्ज्ञ, विशेष साधनव्यक्ती,पदवीधर शिक्षक उपस्थित होते.कार्यक्रमाला जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था अहिल्यानगरचे सांख्यिकी विभागाचे नितीन टिळेकर,पुणे डायटचे मंगेश पावडे,



शिरूर तालुका मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष प्राचार्य तुकाराम बेनके,डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या प्रशिक्षण वर्गाचे प्रमुख शहाजीराजे पवार,पुणे जिल्हा मुख्याध्यापक संघाचे उपाध्यक्ष प्राचार्य रामदास थिटे, डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे प्राचार्य डॉ.समीर ओंकार,पुणे जिल्हा कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक संघटना टीडीएफचे जिल्हाध्यक्ष प्रा.जितेंद्रकुमार थिटे,अशोकराव कर्डिले,अर्जुनराव पांढरकर,प्रा गणेश बांगर,बबनराव गुंड,आदिनाथ कर्डिले,डी. एम.आढळ,चंद्रकांत काकडे,प्राची कुलकर्णी उपस्थित होते. डॉ.शेंडकर पुढे म्हणाले की राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०शिक्षक क्षमता वृद्धी प्रशिक्षण संपूर्ण पुणे जिल्ह्यामध्ये तसेच पुणे महानगरपालिका व पिंपरी चिंचवड महानगरपालिका यामध्ये सुरू आहे शिक्षक सक्षमीकरण करून २०२० चे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण प्रभावीपणे राबवणे हा या प्रशिक्षणाचा उद्देश आहे या निमित्ताने प्रशिक्षणार्थींना डॉ.शेंडकर यांनी शुभेच्छा दिल्या सर्व उपस्थित मान्यवरांचे आभार प्राचार्य रामदास थिटे यांनी मानले.

## पोस्ट कार्यालयाचा भोंगळ कारभार ! अधिकाऱ्याचे दुर्लक्ष;तक्रार घेण्यास नकार. अधिकाऱ्याच्या कामावर प्रश्न चिन्ह उपस्थित?

उल्हासनगर पूर्व येथील कॅम्प क्रमांक ४ येथील पोस्ट कार्यालय मध्ये येणारे पत्र , नोटीस, आधारकार्ड पॅन कार्ड नागरिकांपर्यंत पोहचत नसून ते एक तर पुन्हा रिटर्न पाठवत किंवा ते नागरिकांपर्यंत पोहचत नसून जाळण्यात येत आहे. तसेच २० मार्च रोजी दहा चाळ सुभाष टेकडी उल्हासनगर ४ येथे मैदानात कचरा जाळात असताना त्यात काही आधार कार्ड दिसून आले ते जळत असल्याचे निदर्शनात आल्यास ते त्यातून काढण्याचे काम सुरू केले असता कमीत कमी २५ ते ३० आधार कार्ड जे भरत नगर तसेच महात्मा फुले परिसरात राहणाऱ्या नागरिकांचे आधार कार्ड त्या आगीतून काढले असता धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे पोस्ट कार्यालय मध्ये येणारे भारत सरकार कडून प्रत्येक नागरिकांना देण्यात आलेले भारतीय विशिष्ट ओळख प्राधिकरण (आधार कार्ड) नागरिक आपल्या बँक तसेच इतर सरकारी कामाकरीता वापर करण्यास अनिवार्य केले असताना देखील पोस्ट कार्यालय मधील कर्मचारी ते असेच कचऱ्याच्या ढीगात फेकत असल्याचे आढळून आले ही खूप मोठी बाब आहे. सदर विषयाची तक्रार करण्यास उल्हासनगर ४ येथील पोस्ट कार्यालय प्रबंधक संदीप सैदाने यांना या प्रकरणी माहिती देण्यात आली असता त्यांनी या कडे गंभीरता पूर्वक लक्ष देत नसून ते जून आधार कार्ड आहेत



कदाचित ८- १० महिने जून असल्याचे सांगून विषय संपवला. परंतु नागरिकांना त्यांच्या घरापर्यंत आधार कार्ड पोहचत नसल्याने त्यांची होणारी सरकारी कामात हलगर्जी पणा दिसून येत आहे पूर्ण वेळ कायम स्वरुपी कर्मचारी नसल्याने जास्त काम असल्यामुळे पोस्टमन असे करत असून त्यांच्या वर प्रबंधक साहेबाचा आशीर्वाद असल्याचे दिसून येत आहे ,त्यांना सदर प्रकरणात काही गांभीर्य नसून कुठली ही कारवाई तसेच कुठली ही तक्रार नोंद करून घ्यावी असे त्यांना वाटत नाही त्यांनी जुने कार्ड आहे असे सांगून विषय संपवला. याबाबत वरिष्ठांना तक्रार केली असून याबाबत अधिक लक्ष दिले पाहिजे. या सर्व गोष्टीचा पाठपुरावा अड प्रशांत चंदनशिव यांनी केला असून कार्यवाही करण्यासाठी मागणी केली जात आहे

# खारघर मृत्यू प्रकरण; आयोजक जबाबदार संस्थेवर कारवाई करा - आमदार प्रशांत ठाकूर यांची आक्रमक मागणी

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**

खारघरमधील इज्तिमाच्या कार्यक्रमाला आलेल्या रेहान शेख व फैजान शेखने शिवकुमार शर्मा या युवकाला जीवघेणी मारहाण केली आणि या हल्ल्यात शिवकुमार यांच्या डोक्याला गंभीर दुखापत होऊन जीव गमवायला लागला. या क्रूर घटनेचे गांभीर्य लक्षात घेता या प्रकाराला जबाबदार असलेल्या संस्थेवर कारवाई करण्याची आणि भविष्यात अशा प्रकारच्या कार्यक्रमांना परवानगी देऊ नये, अशी आग्रही मागणी आमदार प्रशांत ठाकूर यांनी आक्रमकपणे विधिमंडळाच्या अधिवेशनात केली. खारघर येथील सिडकोच्या कॉर्पोरेट पार्क मोकळ्या भूखंडावर दि. ३१ जानेवारी ते २ फेब्रुवारी २०२५ रोजी अंजुमन मदरसा अरेबिया इस्लामिया कासिमुल हक्कानी मस्जिद या संस्थेच्या माध्यमातून इज्तिमाचे आयोजन करण्यात आले होते. दरम्यान सिडकोने परवानगी देताना ध्वनी प्रदूषण, कायदा सुव्यवस्था, रहदारी व अन्य संबंधी घालून दिलेल्या अटी शर्तीचे पालन आयोजकांकडून झाले नाही. इज्तिमाच्या दिवशी सायंकाळी मोहम्मद रेहान शेख व अन्य एका इसमाने आयटी व्यावसायिक शिवकुमार शर्मा या युवकाला जबर मारहाण केली आणि या मारहाणीत सदर युवकाच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली. त्या अनुषंगाने शिवकुमार शर्मा या युवकाने तक्रार दाखल खारघर पोलीस स्टेशनमध्ये गेले होते. जखमी अवस्थेत पोलिस स्टेशनला असताना डोक्यात मोठ्या प्रमाणात रक्तस्त्राव झाल्याने अस्वस्थ अवस्थेत शिवकुमार शर्मा यांचा मृत्यू झाला. इज्तिमाच्या आयोजनाच्या अनुषंगाने परवानगी घेताना वाहतूक, पार्किंग, स्वच्छता, सुरक्षा अशा विभागात प्रत्येकी ३०० असे एकूण १२०० व्हॉलेंटिअर लावणार असल्याचे सांगितले होते. तसेच इज्तिमाला ५० हजार लोकं उपस्थित राहणार असल्याचे त्यामध्ये सांगण्यात आले. मात्र प्रत्यक्षात २ लाखापेक्षा जास्त लोकं




या ठिकाणी उपस्थित राहिले. खारघर शहरातील उत्सव चौकाजवळ रस्ता क्रॉस करताना हि मारहाणीची घटना घडली त्या ठिकाणी वाहतूक पोलीस तसेच आयोजकांचे व्हॉलिंटिअर हजर नव्हते. वाद होतोय, मारामारी होतेय आणि हेल्मेटच्या प्रहाराने जीव जाण्यापर्यंत मारहाण केली जाते मग मदत करायला कुणीही आले नाही जर त्या ठिकाणी आयोजकांचे व्हॉलेंटिअर होते तर त्यांनी यामध्ये मदत करायला हवी होती. मात्र तसे झाले नाही आणि यामध्ये शिवकुमार शर्मा यांचा नाहक जीव गेला. असे सभागृहाला आमदार प्रशांत ठाकूर यांनी सांगतानाच विशेष म्हणजे या इज्तिमाला ०४ डिसेंबर २०२४ ते ३० जानेवारी २०२५ पर्यंत अशी तब्बल ५८ दिवसांची परवानगी सिडकोने दिल्याचा प्रकारही त्यांनी उघडकीस आणला. जर एवढ्या मोठ्या प्रमाणावर कार्यक्रम होणार होता तर तशी काळजी घेणे आयोजक संस्थेची जबाबदारी होती. म्हणूनच अप्रत्यक्षरित्या का होईना हि संस्था या मृत्यूला जबाबदार आहे. त्यामुळे या संस्थेविरोधात गुन्हा दाखल करावा आणि अशा संस्थेला भविष्यकाळात कार्यक्रम करण्याची परवानगी देऊ नये तरच लोकांच्या जीविताचे संरक्षण होईल त्यामुळे अशी काळजी शासनाने घेण्याचीही मागणी आमदार प्रशांत ठाकूर यांनी सभागृहात आक्रमकपणे केली. त्याचबरोबरीने येथे जो कार्यक्रम झाला त्या खारघर ठिकाणी आता मोठ्या प्रमाणात अनधिकृत मशिदी उभ्या राहत आहेत. या ठिकाणी हॉटेल बेसमेंटमध्ये नमाज पठणासाठी वेगवेगळ्या सुविधा मिळणार अशा ऑफर केल्या जातात त्या आशयाचे स्टिकर रेल्वेमध्ये लावले जात आहेत. आणि त्या अनुषंगाने आता खारघर तळोजा परिसराचा मुंब्रा करण्याचा घाट घातला जात आहे. आणि या प्रयत्नांना येथे कायद्याला कुठल्याही प्रकारचा स्थान नाही अशी स्थिती निर्माण होत आहे. त्यामुळे या ठिकाणी असे प्रकार वारंवार घडणार असतील तर ती थांबवण्याची जबाबदारी शासनाची आहे. मुंबईची संस्था खारघरमध्ये आयोजन करते आणि नियम पायदळी तुडवते त्यामुळे भविष्य काळामध्ये असे कार्यक्रम आयोजनाला परवानगी देऊ नये अशी मागणीही त्यांनी सभागृहात केली. गृहराज्यमंत्री (शहरे) योगेश कदम यांनी दिलेल्या उत्तरात म्हंटले कि, इज्तिमाच्या कार्यक्रमासंदर्भात आयोजकांनी सर्व परवानग्या घेतल्या होत्या. या ठिकाणी ६०० पोलीस आणि कर्मचारी उपलब्ध करून देण्यात आले होते. आयोजकांचे ७०० व्हॉलेंटिअर त्या दिवशी कार्यरत होते. हि घटना कार्यक्रम स्थळापासून दोन ते अडीच किलोमीटर अंतरावर घडली. ओव्हरटेक करताना वाद झाला आणि त्यामध्ये आरोपीकडून मारहाण झाली. या प्रकरणाची तक्रार करण्यासाठी शिवकुमार शर्मा गेले असता ते जवळपास सात मिनिटे खारघर पोलीस ठाण्यात होते. दरम्यान त्यांच्या तब्येतीत अस्वस्था निर्माण झाल्याने त्यांना पोलीस कर्मचाऱ्यांनी शेजारील रुग्णालयात उपचारासाठी नेले मात्र त्यांच्या मृत्यू झाला. तत्पूर्वी त्यांचा जबाब घेतला असता यामध्ये तसेच काही साक्षीदारांचे जवाब नोंदवला असता त्यांनी गाडीला कट मारण्याचा मारण्यावरून आपापसात वाद झाल्याचा जबाब दिला आहे. नियमात बसून जर कार्यक्रमाचे आयोजन केले जात असेल तर परवानगी नाकारता येत नाही. तथापि भविष्यात असे कार्यक्रम घेत असताना व्यवस्थापनाचा विषय येतो त्यावेळी आयोजक आणि त्या संबंधित विभागाने काळजी घेणे गरजेचे आहे. इज्तिमाच्या पहिल्या दिवशी पहिल्या दिवशी १५ हजार, दुसऱ्या दिवशी २५ हजार तर तिसऱ्या दिवशी ३ लाख लोकं या कार्यक्रमाला उपस्थित होते. त्यामुळे भविष्यात अशा परवानग्या देत असताना काळजी घेतली जाईल, असे नामदार योगेश कदम यांनी आश्वासित केले. या कार्यक्रमाच्या अनुषंगाने ५८ दिवसाच्या परवानगीवर बोलताना या संदर्भात आपल्याला माहिती नसल्याचे त्यांनी सांगितले. त्यामुळे त्याचीही माहिती घेणार असल्याचे त्यांनी सभागृहाला सांगितले. यावेळी या परवानगीच्या विषयावर सूचना करताना तालिका अध्यक्ष योगेश सागर यांनी, एका संस्थेला मैदानासाठी ५८ दिवसाची परवानगी दिली असेल तर ते अयोग्य असल्याचे अधोरेखित केले. आणि गरजेपेक्षा जास्त दिवसांची परवानगी संदर्भ राज्यभर वापरला जाणार नाही यासाठी सरकारने विचार केला पाहिजे, असे निर्देश दिले. यावेळी मंत्री योगेश कदम यांनी गरजेपेक्षा जास्त दिवसांची परवानगी दिली जाणार नसल्याचे आश्वासन दिले.